
ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

एप्रिल २०११ मूल्य १० रुपये



'जळगावरत्न'
भवरलाल जैन




डिकन्सचे
'ए टेल ऑफ टू सिटीज'

## भारतीय कॉमिक्सचे पितामह अनंत पै
विवेक मेहेत्रे

## जगात सर्वाधिक खप असलेले पुस्तक
दिलीप चावरे

## इस्टेटीची वाटणी
डॉ. उज्ज्वला दळवी




शरयू ठाकूर
यांचे निर्मळ जग

## घर एक स्टुडिओ
सुधीर पटवर्धन



RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011
RNI NO - 428 / 1987
POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 40



वसंत देशपांडे लिखित 'महाराष्ट्राची सुवर्णगाथा' पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच विधानभवनात झाले.
त्याप्रसंगी लेखक वसंत देशपांडे, मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, अनिकेत जोशी, दिलीप चावरे आणि सुदेश हिंगलासपूरकर

## खेळ मांडला.... पुस्तक प्रकाशनसमयी




प्रकाशभाई मोहाडीकर, नाना जोशी, डॉ. बापूसाहेब रेगे, लेखिका विभावरी दांडेकर, अशोक टिळक, नीलेश निमकर आणि धनराज वंजारी

'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली'करता इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०० ०३१ येथे छापून ग्रंथाली, द्वारा संडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, दादर (प), मुंबई ४०००२८ येथे प्रकाशित केले.

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# रुची

**एप्रिल २०११ वर्ष ३१ वे,**
**अंक चौथा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
या अंकाचे संपादन : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **तळाला सुधीर पटवर्धन यांचे चित्र**
**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर, ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर(प), मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@gmail.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स.न.

२३ एप्रिल हा जागतिक ग्रंथदिन. तो साजरा होईल. 'साजरा करणे' याचे महत्त्व अधिक असलेला हा काळ आहे. वि.वा. शिरवाडकरांचा जन्मदिन मराठी भाषादिन म्हणून साजरा होतो, तसा. ग्रंथाशी देणेघेणे असायलाच हवे असे नाही, त्यातला 'मराठी' हा शब्द अस्मितेशी जोडून साजरा केलेला तो दिवस असतो. मराठी अस्मिता सलामत तर शिरवाडकर पचास, असे काहीसे घडते आहे. या अस्मितेच्या दर्शनाचे शिरवाडकर हे एक निमित्त. ग्रंथ वा लेखक याबद्दल उदासीन असणारे साहित्य संमेलनाचे आयोजक असू शकतात हे वास्तव आहे. आयोजकाला सर्वच माहीत असावे असे नाही, पण ते जाणण्याची जिज्ञासा हवी ना!

पुस्तकाचे वाचन जिज्ञासेतून होते. त्यातून कुतूहल वाढते. ओघाने वाचनप्रसार होतो. महाराष्ट्रसारख्या प्रगत राज्यात पस्तीस वर्षांपूर्वी खेड्यात पुस्तक पाहायला मिळणे दुरापास्त होते. 'पुस्तक दिसते कसे हो?' हा प्रश्न 'ग्रंथाली'च्या जन्माचे एक कारण ठरला. त्याचेच रूपांतर महाराष्ट्रात अभिनव वाचक चळवळ म्हणून ग्रंथालीने उठवलेल्या ग्रंथमोहोळात झाले. महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर सांस्कृतिक चळवळ म्हणून राज्यव्यापी उत्स्फूर्त सहभाग लाभलेली ग्रंथाली ही एकमेव चळवळ झाली.


बुकाचे फेस न पाहिलेली एक पिढी आणि सहजपणे फेसबुक हाताळणारी आताची पिढी हे परिवर्तनही याच फक्त पस्तीस वर्षांतले. पुस्तक हेच एक माध्यम असलेल्या काळापासून, विविध माध्यमांतून मिळणाऱ्या ज्ञानाच्या तंत्रक्रांतीचा हा काळ तसा लहान तरी त्याचा रेटा महान आहे. फेसबुकाने ग्लोबल खेड्यात कुणाच्याही घरात आपण सहज पोचलो आहोत. प्रत्यक्ष भेट ही गरज उरली नाही. व्यक्त होण्यासाठी स्थल-कालाचे बंधन राहिले नाही. हे चांगलेच आहे. तरी बुक असो वा फेसबुक, कधी गणपती दूध पितो, तर कधी दत्ताच्या देवळातील गायीची मूर्ती दूधप्राशन करते, इतकाच बोध आपण 'वाचलेले' घेत राहणार का? जपानमध्ये निसर्गाने भयंकर आघात केला, तरी चर्चा वर्ल्डकपमध्ये भारत जिंकणार का याचीच दिसते. भामरागड येथे नक्षलवादींच्या विरोधात दोन हजार आदिवासी, जोखीम असूनही, उभे ठाकतात याचे भान नसते. दुर्दैवाने, ग्रंथातून मिळालेले ज्ञान आणि संवेदना यांतले अंतरही याच पस्तीस वर्षांत वाढलेले दिसते. याच पार्श्वभूमीवर ग्रंथालीने १ ते १४ एप्रिल दरम्यान ग्रंथयात्रा योजली आहे. निमित्त आहे को.म.सा.प.च्या रोहा येथील साहित्य संमेलनाचे. या पाडव्यापासून दरमहा एखादे पुस्तक खरेदी करून पुढल्या वर्षी पुस्तकगुढी उभारण्याची शपथ या यात्रेच्या आरंभी घेतली जावी असे आवाहन सुदेशने केले आहे. हे 'साजरे' करणे नाही, ही एका कार्यकर्त्याची हाक आहे. आपण प्रतिसाद दिला तर जागतिक पुस्तकदिन धन्य होईल. 'अमर चित्रकथा'चे अनंत पै यांचे नुकतेच निधन झाले. मराठी साहित्यात मोलाची भर घालणाऱ्या पै यांच्याबद्दल विवेक मेहेत्रे लिहीत आहेत. 'जनसंवाद' या सदराचा समारोप होत आहे.

**– संपादक**

# भारतीय कॉमिक्सचे पितामह **अनंत पै**

**विवेक मेहेत्रे**

ते वर्ष होते १९८४. मी नुकताच मुंबईच्या व्ही.जे.टी.आय. या अभियांत्रिकी महाविद्यालयातून एम.इ. पूर्ण करून बाहेर पडलो होतो. जरी मी लौकिकार्थाने अभियंता झालो होतो तरी तेव्हा प्रसिद्ध झालो होतो हास्यचित्रकार म्हणूनच...! माझ्यावर शालेय व महाविद्यालयीन जीवनात 'कॉमिक्स'चा प्रचंड (पण चांगला) प्रभाव पडला होता. इंद्रजाल कॉमिक्स व अमर चित्रकथांचे वाचन पाठ्यपुस्तकांपेक्षा जास्त व आवडीने करत होतो. इतर कोणी कदाचित त्या चित्रकथा वाचून सोडून देत असले तरी मी मात्र त्यांची पटकथा कशी बनवत असतील, कमी शब्दांत व अपुऱ्या जागेत/चौकटीत एखादा प्रसंग विशिष्ट कॅमेरा अँगलने कसा रेखाटत असतील? याच प्रश्नांचा विचार झपाटल्यासारखा करायचो...अन् त्यातून एक विचार पक्का झाला. आपणही कॉमिक्स डिझायनर व्हायचे. १९८४ मध्ये मी 'कार्टून सर्व्हिस' ही सिंडिकेट संस्था उत्साहाने सुरू केली. कोणाचेही रीतसर मार्गदर्शन नव्हते. त्या काळात ज्या ज्या नामवंत दैनिकांकडे आम्ही प्रस्ताव पाठवायचो तिथे एक नाव कानावर पडायचे व ते असायचे 'रंगरेखा फीचर्स'च्या अनंत पै यांचे.... ज्येष्ठ असले तरी प्रतिस्पर्धीच ना? मग मनात जबरदस्त कुतूहल निर्माण झाले, की कोण हे अनंत पै? ते कुठे असतात? मग चौकशी सुरू केली. योगायोग म्हणजे माझ्यासोबत 'कार्टून सर्व्हिस'मध्ये चित्रकथा रेखाटणाऱ्या राम वाईरकर, वसंत हळबे यांनी अनंत पै यांच्यासोबत प्रदीर्घ काळ काम केले होते. माझ्या अनेक प्रश्नांची उत्तरं मिळत गेली. पै यांना प्रत्यक्ष भेटण्यापूर्वीच त्यांच्याविषयी भरपूर माहिती गोळा झाली होती. मनातला आदर फार वाढला. एखाद्या विषयात झोकून देऊन एखादी व्यक्ती किती प्रचंड काम करू शकते याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे अनंत पै. त्यामुळेच पै त्यानंतर मला कधीही प्रतिस्पर्धी वाटले नाहीत. नंतर तर त्यांनी 'रंगरेखा'चा पसारा कमी करून अमर




चित्रकथाचा व्याप वाढवला. डोळ्यांपुढे आज ती पै यांची, त्यांच्या जीवनाची 'खरी चित्रकथा' तरळतेय. तीच मी इथे लिहितोय, शब्दांतून...

१७ सप्टेंबर १९२९ रोजी दक्षिण कर्नाटकात अनंत पैंचा जन्म झाला. दुसऱ्या वर्षानंतर माता-पित्यांचं छत्र हरपले. १२ वर्षापर्यंत जवळच्या नातेवाईकांनी त्यांना त्या छोट्या गावातच शिकवले. पण उच्च शिक्षणासाठी तेराव्या वर्षी मुंबईत यायची संधी मिळाली. जरी तो पारतंत्र्याचा काळ होता, पण अनंत फार बुद्धिमान असल्याने पुढील शिक्षण चांगल्या मार्कांनी झाले. मुंबईच्या यु.डी.सी.टी.मधून त्यांना रसायनशास्त्रातील अभियंते म्हणून बाहेर पडले. त्यांना त्यांच्या शालेय जीवनात वेद, पुराणे, धार्मिक वाङ्मय, संस्कृत भाषा यांची आवड निर्माण झाली होती. (अनंत पैंना पाली व अर्धमागधी या भाषासुद्धा अवगत होत्या.) संस्कृत वचने, सुभाषिते व श्लोक उत्तम पाठ झाले होते. पदवी रसायनशास्त्राची होती पण १९५० मध्ये नोकरीची संधी मिळाली ती 'टाइम्स ऑफ इंडिया' या ख्यातनाम प्रकाशनसंस्थेत. फँटम, मँड्रेक, फ्लॅश गॉर्डन अशा चित्रकथा-नायकांच्या परदेशातून आयत्या आयात झालेल्या चित्रकथांचे मुद्रण व वितरण करण्याचे काम तेव्हा 'इंद्रजाल कॉमिक्स'तर्फे केले जात असे. त्याच काळात पै हिंदीतूनही लिहीत असत. ('बीच की कडी' नावाची एक हिंदी कादंबरी त्यांनी लिहिली. त्यावर उर्दू भाषेचा प्रभाव होता.) खरे तर, इंद्रजाल कॉमिक्सची नोकरी छान होती, पण भारतीय कथानकं नसलेल्या चित्रकथांची पुस्तके छापण्याचा पैंना कंटाळा येऊ लागला. त्यातच एकदा, ते पत्नी ललिता पैंसोबत त्या काळी एकमेव असलेल्या भारतीय दूरदर्शनवर (तेव्हा अन्य हिंदी-इंग्रजी खाजगी चॅनेल्सच नव्हती!!) 'क्विझ शो' पाहात होते. शालेय विद्यार्थ्यांकडून ग्रीक वाङ्मयावर/इतिहासावर आधारित प्रश्नांना पटापट उत्तरे मिळत होती. पण इंग्रजी शाळेत शिकणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांना 'रामाची आई कोण?' या सोप्या प्रश्नाचे उत्तर देता आले नाही हे पाहून अनंत पै दुःखी झाले. विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, इतिहास ठाऊक नसण्याची अनेक कारणे होती. शहरातली छोटी कुटुंबे, घरात कथा सांगायला आजी-आजोबा नसणे, पालकांचे अज्ञान ही प्रमुख कारणे होती. म्हटले तर ही फार गंभीर समस्या होती पण पै यांच्याकडे त्याचं उत्तर होतं. हे सगळे कथानायक एका निराळ्याच 'फॉरमॅट'मध्ये सादर करायचे. त्यांनी ही खर्चिक, वेडी कल्पना काही प्रकाशकांकडे मांडली, पण कोणालाही त्यात रुची वाटली नाही.

आर्थिक पाठबळ मिळाल्याशिवाय पैंची ही कल्पना वास्तवात उतरणे अशक्य होते.

'इंडिया बुक हाऊस'च्या जी.एल. मिरचंदानी यांना मात्र ही कल्पना अभिनव वाटली. अनेकांचा असा समज असेल की 'अमर चित्रकथा' हे शीर्षक अनंत पैंना सुचले, पण तसे नाहीय. प्रख्यात बालवाङ्मयकार, भाषांतरकार व 'फास्टर फेणे'चे जनक भा.रा. भागवत यांनी 'अमर चित्रकथा' हे सोपे, सुटसुटीत नाव सुचवले व अनंत पै ते आवडले. तेच नाव पुढे जगभर अनेक वाचकांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनले. 'अमर चित्रकथा'च्या यशात पै यांच्यासोबत अनेक कुशल लेखक/कॉमिक्स डिझायनर व चित्रकारांचा वाटा आहे. सुब्बाराव, कमला चंद्रकांत, यज्ञ शर्मा, गायत्री मदन दत्त, टोनी पटेल, भारती व्यास, लुईस फर्नांडिस यांसारखे मेहनती पटकथा लेखक व सहकारी त्यांना मदत करत असत. प्रभाशंकर कवडी, प्रताप मुळीक, वसंत हळबे, राम वाईरकर, प्रदीप साठे, चंद्रकांत विटणकर यांसारखे ज्येष्ठ चित्रकार पैंच्या कल्पना कागदावर रेखाटत. दिलीप कदम, अशोक डोंगरे, चव्हाण, नांगरे, नाईक यांच्यासारखे चित्रकार जरी या रेखाटनांत आपली प्रतिभा वापरत तरी त्यांचे अनंत पैंसोबत सतत खटके उडत. कारण पैंना चित्रामध्ये एकही चूक खपत नसे. वेषभूषा व स्थापत्य यातील संदर्भ बिनचूक असावेत असा त्यांचा हट्ट असे. त्यासाठी चित्रकारांनी मुंबईतील म्युझियमचे तत्कालीन क्युरेटर मोतीचंद्र यांचे मार्गदर्शन घ्यावे अशी त्यांची सूचना असायची. 'कृष्ण' ही अमरचित्रमालेतील पहिली कथा आजही अनेकदा प्रकाशित होते. पाहता पाहता अमर चित्रकथामालेत ४४० पुस्तके प्रसिद्ध झाली. त्यांचा एकत्र खप १०० दशलक्ष प्रतींपेक्षा जास्त आहे, हा एक विक्रमच म्हणायला हवा.

दुर्दैवाने पै दांपत्याला मूलबाळ नव्हते. पण अनंत पै मूळचेच उत्तम संवादक होते. देवळातील कीर्तनकाराने बाळबोध शब्दात कथा सांगावी तसे मुलांना रंगवून, रंगवून कथा सांगायला त्यांना आवडत असे. शाळांमध्ये



**'अमर चित्रकथा'चे संस्थापक अनंत पै**

'कॉमिक्स' या माध्यमाबाबत शिक्षक व संस्थाचालकांमध्ये असलेली एक प्रकारची नाराजी घालवण्यासाठी ते अनेक शाळांमध्ये स्वत:च्या कथाकथनाचे, प्रश्नोत्तरांचे कार्यक्रम आयोजित करू लागले. या कल्पनेमुळे ते बालवाचकांमध्ये कमालीचे लोकप्रिय झाले. त्यांचे ते 'अंकल पै' बनले व ती पदवी त्यांना कायमचीच चिकटली. त्यांची स्वत:ची इंटरनेटवरील वेबसाइटही पुढे 'अंकल पै डॉट कॉम' याच शीर्षकाने अवतरली.

अनंत पैंमध्ये एक ज्ञानपिपासू पण अवखळ, प्रचंड ऊर्जा असलेला विद्यार्थी कायम लपलेला आहे असे मला सारखे जाणवायचे. मोहापासून दूर असलेल्या त्यांच्या जीवनात शिस्त होती. पहाटे ३.३० ला त्यांचा दिवस सुरू व्हायचा व रात्री ९ पर्यंत ते सतत कामात व्यस्त राहायचे.

'रामू आणि शामू', 'कपिश', 'रेखा', 'छोटी राज्जी', 'फन टाइम', 'फक्ट फॅन्टसी', 'फन लँड' या सर्व लोकप्रिय चित्रसदरांचा जन्म अनंत पैंच्या प्रतिभेतून झाला. एवढेच करून ते थांबले नाहीत. 'एकम् सत्' व 'दी सिक्रेट ऑफ सक्सेस' या दोन व्हिडियो चित्रफितींची निर्मिती त्यांनी केली. "How to develop self confidence?", "How to Achieve Success" व "How to Develop A Super Memory" ही पुस्तके त्यांनी लिहिली व 'स्टोरी टाइम विथ अंकल पै' व 'अमर चित्रकथाच्या ऑडियो कथा' मालिकेतील अनेक ऑडियो कॅसेट त्यांनी यशस्वी करून दाखवल्या.

सर्व भाषांतील भारतीय विद्यार्थ्यांचे अफाट प्रेम त्यांना लाभले. (१९७० ते २००० या कालखंडात जे विद्यार्थिदशेत होते त्यांना आजही 'अमर चित्रकथा' आठवतात. देश-परदेशात पसरलेल्या व मोठ्या पदांवर असलेल्या व्यक्ती आजही त्या भावविश्वात रमतात व तसा स्पष्ट उल्लेख अनेकदा त्यांच्या ब्लॉग्जवर करतात.) त्यातूनच पुढे Tinkle या मासिकाचा (१९८०) जन्म झाला. अनंत पै आणखी बिझी झाले. त्यांना अनेक पुरस्कार लाभले तरी ते स्वत: पुरस्काराच्या आशेने काम करत नसत. त्यांच्यासाठी सर्वोच्च मानाचा ठरेल असा पुरस्कार 'भारतीय कॉमिक्स क्षेत्रातील जीवनगौरव पुरस्कार' त्यांना फेब्रुवारी २०११ मध्ये दिल्ली येथे दिला जाणार होता. पण नियतीच्या मनात काही निराळेच होते. एका छोट्याशा अपघाताचे निमित्त झाले व ते पाय घसरून पडले. त्याही अवस्थेत त्यांना दिल्लीला जायचे होते, पण डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करणे महत्त्वाचे असल्याचे सांगितल्याने त्यांचा नाइलाज झाला. त्यांच्या अनुपस्थितीतच त्यांना हा पुरस्कार दिला गेला व २४ फेब्रुवारी २०११ रोजी संध्याकाळी त्यांना आलेला हृदयविकाराचा गंभीर झटका निर्णायक ठरला.

अनंत पै ऋषीतुल्य जीवन जगले, छोट्याशा घरात राहिले. आपल्या मूल्यांसाठी त्यांनी प्रचंड वादावादी केली, पण तडजोड करून व्यावसायिक नीतिमत्ता घसरू दिली नाही, म्हणूनच एक समव्यावसायिक या नात्याने मला ते सतत महान वाटत राहिले.

# ‘महाराष्ट्राची सुवर्णगाथा’ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशित

ज्येष्ठ वार्ताहर वसंत वासुदेव देशपांडे यांनी लिहिलेल्या ‘महाराष्ट्राची सुवर्णगाथा’ या पुस्तकाचे प्रकाशन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते २४ मार्च २०११ रोजी विधानभवनात झाले. महाराष्ट्र राज्य स्थापनेला येत्या १ मे रोजी ५० वर्षे पूर्ण होत आहेत. या सुवर्णमहोत्सवी वर्षारंभी ‘ग्रंथाली’ने ‘महाराष्ट्राचा लेखाजोखा’ हे पुस्तक प्रसिद्ध केले. त्यात अनेक नामवंत पत्रकारांचे लेख आहेत. महाराष्ट्र राज्य स्थापनेपूर्वीचे आंदोलन, संयुक्त महाराष्ट्राचा मंगलकलश, यशवंतराव चव्हाण यांची कारकीर्द आणि महाराष्ट्राची वाटचाल आदी विषयांचा परामर्श त्यात घेण्यात आला आहे. या पुस्तकात वसंत देशपांडे यांचाही लेख आहे.

दस्तऐवजीकरण (डॉक्युमेंटेशन) या प्रमुख साहित्यप्रकाराकडे आजही भारतात गांभीर्याने पाहिले जात नाही. या पार्श्वभूमीवर देशपांडे यांचे ‘महाराष्ट्राची सुवर्णगाथा’ हे पुस्तक या मार्गावरील एक छोटे पण महत्त्वाचे पाऊल आहे.

देशपांडे १९६०च्या पूर्वीपासून मंत्रालय आणि विधिमंडळ येथून वृत्तसंकलन करत आहेत. महाराष्ट्राच्या पहिल्या मुख्यमंत्र्यांपासून विद्यमान मुख्यमंत्र्यांपर्यंतचा घटनाक्रम त्यांच्या डोळ्यांदेखत घडला आहे. एवढा दीर्घकाळ पत्रकारिता केल्यामुळे त्यांच्याकडे अनुभवांचे मोठे संचित आहे. त्यातील निवडक अंश ‘महाराष्ट्राची सुवर्णगाथा’ या पुस्तकात समाविष्ट करण्यात आला आहे.

देशपांडे यांच्या पुस्तकाचा केंद्रबिंदू आहे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री. प्रत्येक मुख्यमंत्र्यांची अल्प माहिती, सोबत महत्त्वाच्या घटनांच्या तारखा आणि महाराष्ट्रातील त्यावेळचे वातावरण यांची साकल्याने नोंद करत त्यांनी मर्यादित पृष्ठसंख्येत महाराष्ट्राचा राजकीय सारीपाट उलगडून दाखवण्याची किमया साध्य केली आहे. त्यात सर्वकाही आले आहे असे नाही, परंतु एक संदर्भग्रंथ म्हणून त्याला निश्चितच मूल्य आहे. मात्र अशी अनेक पुस्तके उपलब्ध होणे आवश्यक आहे कारण त्यामुळेच इतिहासाची नोंद परिपूर्ण होण्यास हातभार लागणार आहे.

मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण या ग्रंथाच्या संदर्भमूल्याचे विवेचन करताना म्हणाले की तरुण पिढीने, राजकीय कार्यकर्त्यांनी आणि अभ्यासकांनी अवश्य वाचावे असे हे पुस्तक आहे. आयपॅड किंवा ऑडिओबुक स्वरूपात मराठी पुस्तके यावीत अशी अपेक्षा व्यक्त करून मुख्यमंत्री म्हणाले की यासाठी लागेल ती मदत देण्यास शासन तयार आहे. त्यांच्या घोषणेचे उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले.

तत्पूर्वी आपले मनोगत व्यक्त करताना देशपांडे यांनी आपल्या पुस्तकाची पार्श्वभूमी विशद केली. एकेकाळी देशात अव्वल क्रमांकावर असणाऱ्या महाराष्ट्राच्या घसरगुंडीबद्दल खेद व्यक्त करून त्यांनी यापुढील वाटचालीबद्दल सुप्त चिंता व्यक्त केली.

देशपांडे यांनी ‘आकाशवाणी’साठी तीन दशकांपेक्षा अधिक काळ वार्तासंकलन केले. मोजके शब्द आणि अचूक तपशील यांच्याबद्दल एकेकाळी माध्यमे अत्यंत काटेकोर असत. त्या शैलीतच या पुस्तकाचे लिखाण त्यांनी केले आहे. त्यात कोणावरही दोषारोप नाही आणि कोणाचा उदोउदोही नाही. अत्यंत तटस्थपणे त्यांनी प्रत्येक व्यक्तिमत्त्व आणि प्रसंग यांचे वर्णन केले आहे. पुस्तकाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे काही कर्तबगार मुख्य सचिव आणि सनदी अधिकारी यांच्यावरील खास प्रकरण. शासन चालवण्यात अधिकाऱ्यांची भूमिका फार मोलाची असते. परंतु त्यांना क्वचितच त्याचे श्रेय देण्यात येते. याचे भान राखून देशपांडे यांनी निवडक अधिकाऱ्यांबद्दल लिहिल्याने पुस्तकाचे संदर्भमूल्य आणखी वाढले आहे.

या समारंभास पत्रकार, आमदार व निमंत्रित मान्यवर उपस्थित होते. ‘ग्रंथाली’तर्फे दिलीप चावरे यांनी प्रास्ताविक केले आणि प्रकाशनाच्या या छोटेखानी समारंभाचा समारोप लतिका भानुशाली यांच्या आभार प्रदर्शनाने झाला.

**– प्रतिनिधी**

---

लक्षावधी कॉमिक्सप्रेमींच्या हृदयात ते कायमचे घर करून आहेत व राहतील. आज टीव्ही वाहिन्यांच्या गर्दीमुळे कॉमिक्स माध्यम थोडे मागे पडले आहे. त्यातच पै गेले. एक पर्व संपले. पुन्हा अनंत पैंच्या क्षमतेचा कॉमिक्स डिझायनर या देशात होणे शक्यच नाही. ‘वाचणार नाही तो पुढे आयुष्यात वाचणार नाही’ या तत्त्वावर त्यांचा प्रचंड विश्वास होता. मेहनत, वक्तृत्व, कष्ट करण्याची तयारी, परिपूर्णता व अचूकतेचा हट्ट, विद्वत्ता, अभ्यास, इतरांना प्रेरणा देण्याची इच्छा या विविध गुणांनी युक्त असलेले अनंत पै ज्यांना जवळून पाहायला मिळाले ते माझ्या पिढीतील अनेक जण खरेच भाग्यवंत आहेत. पैंच्या जाण्यामुळे भारतीय कॉमिक्सक्षेत्राचे किती नुकसान झालेले आहे याचे वर्णन करण्यासाठी माझे शब्द अपुरे ठरतील.

**– विवेक मेहेत्रे**

mehetre2011@gmail.com

(विवेक मेहेत्रे व्यंगचित्रकार लेखक, असून गेली ३० वर्षे मुलांसाठी कॉमिक्स स्ट्रीप्स तयार करतात. ‘छोट्यांचा आवाज’ या लोकप्रिय मराठी मासिकाचे ते प्रकाशक/संपादक आहेत. कॉमिक्सचा वापर करून त्यांची अनेक पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत.)


# डिकन्सचे ‘ए टेल ऑफ टू सिटीज’ जगात सर्वाधिक खप असलेले पुस्तक

## दिलीप चावरे

जगातील सर्वाधिक खपाचे पुस्तक आहे चार्लस् डिकन्स याचे ‘ए टेल ऑफ टू सिटीज्’. आतापर्यंत वीस कोटींपेक्षा जास्त प्रती खपलेले इंग्रजी भाषेतील हे पुस्तक १८५९ साली प्रथम प्रसिद्ध झाले. तेव्हापासून आपला अव्वल क्रमांक या पुस्तकाने सातत्याने राखला आहे. सुष्ट आणि दुष्ट प्रवृत्ती यांच्यातील झगडा आणि प्रेम तसेच त्याग यांची महती व्यक्त करण्यासाठी लिहिलेले हे पुस्तक आजही आबालवृद्ध आवडीने वाचतात. विविध देशांमधील आणि भाषांमधील कादंबऱ्यांवर ‘टेल’चा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. फ्रेंच राज्यक्रांतीच्या पार्श्वभूमीवर डिकन्सने त्याचे कथानक रंगवले आहे. रहस्य, उत्कंठा (सस्पेन्स), गुप्त कारवाया, शह आणि काटशह, फ्रान्स आणि इंग्लंड यांच्यातील परंपरागत वैर असे विविध पदर या कथानकास लाभलेले आहेत. विकीपीडिया या प्रसिद्ध संकेतस्थळावर याबाबतचा भरपूर तपशील उपलब्ध आहे.

‘टेल’ ही कादंबरी म्हणजे एक परिपूर्ण पुस्तक आहे. मात्र लोकप्रिय साहित्य प्रकारांवर नजर टाकल्यास हॅरी पॉटर या पुस्तक मालिकेने खपाचा उच्चांक प्रस्थापित केला आहे. जे.के. रॉलिंग या लेखिकेचे हे सात भागांतील कथानक आणि त्याच्यासह तीन संबंधित पुस्तके यांचा खप ४० कोटींवर गेला आहे. त्यांचा प्रसिद्धीकाल आहे १९९७ ते २००७. हॅरी पॉटरचे पहिले पुस्तक खरेदी करण्यासाठी कशा रांगा लागत, याच्या आठवणी अद्याप ताज्या आहेत.

इंग्रजीव्यतिरिक्त चिनी, फ्रेंच, पोर्तुगीज, जर्मन, स्पॅनिश आणि इटालियन भाषांमधील पुस्तकेही महाखपाच्या यादीत सापडतात. अर्थातच त्यांची इंग्रजी भाषांतरे झाल्यानंतरच त्यांना हे भाग्य लाभले आहे. त्यात अनेक साहित्यप्रकार आहेत. परंतु कादंबरी हा साहित्यप्रकार सर्वाधिक लोकप्रिय असल्याचे स्पष्ट आहे. जगात सर्वाधिक खपलेली पाच पुस्तके अशी:-




१) ए टेल ऑफ टू सिटीज, चार्लस् डिकन्स, इंग्रजी, २० कोटीपेक्षा जास्त

२) द लॉर्ड ऑफ द रिंग्ज, जे.आर.आर. टोलकिन, इंग्रजी, १५ कोटीपेक्षा जास्त

३) द हॉबिट, जे.आर.आर. टोलकिन, इंग्रजी, १० कोटीपेक्षा जास्त

४) ड्रीम ऑफ द रेड चेंबर, काओ झिएन, चिनी, १० कोटीपेक्षा जास्त

५) अँड देअर वेअर नन्, ॲगाथा ख्रिस्टी, इंग्रजी, १० कोटीपेक्षा जास्त

पुस्तकांच्या खपानुसार करण्यात आलेले वर्गीकरण पाहता एक कोटीपर्यंत प्रती खपलेल्या पुस्तकांची नावे त्यात सापडतात. जपानी, रशियन, कोरियन, स्वीडिश, डच, नॉर्वेजिअन अशा भाषांमधील पुस्तकांचा त्यात समावेश आहे. या यादीत एकही भारतीय लेखक आणि एकही भारतीय भाषेतील पुस्तक आढळत नाही. या मुद्दयाचे स्वतंत्र विवेचन करता येईल.

लंडन आणि अशा दोन महानगरांमधून फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळात ‘टेल’चे कथानक आकार घेते. फ्रेंच सामंतशाही गरीब शेतकऱ्यांवर कसे अत्याचार करत असे आणि त्यातून राज्यक्रांतीची ठिणगी कशी पडली याचे वर्णन करतानाच एखाद दुसऱ्या प्रसंगाचे चित्रण करत डिकन्स क्रांतिकारकांच्या क्रौर्याचेही पाढे वाचत जातो. इंग्लंडमधील अमीर-उमरावांचे भोगविलासी, स्वैराचारी वर्तनही पुस्तकातून तंतोतंत समोर येते. ‘टेल’ची सर्वप्रथम प्रसिद्धी डिकन्स प्रकाशित करत असलेल्या ‘ऑल द इयर राऊंड’ या साप्ताहिकातून ३२ आठवडे आणि ४५ प्रकरणांमधून झाली. हा प्रकाशनकाळ होता मे-डिसेंबर १८५९. त्यानंतर डिकन्सनेच आठ मासिक हप्त्यांमधून ती पुन्हा प्रकाशित केली. ‘टेल’चे वैशिष्ट्य म्हणजे दर आठवड्याला तिची काही प्रकरणे छापून येत. डिकन्सची आधीची सर्व पुस्तके मासिक हप्त्यांमधून प्रसिद्ध झालेली होती. ‘टेल’चा प्रथम अंश ३० एप्रिलला तर अखेरचा भाग २५ नोव्हेंबर १८५९ रोजी प्रसिद्ध झाला.

डिकन्स हा बहुप्रसव लेखक असला तरी इतिहासाचा आधार घेऊन त्याने दोनच कादंबऱ्या लिहिल्या. ‘टेल’ आणि ‘बार्नेबी रूज’. त्याच्या इतर कादंबऱ्यांमध्ये भरपूर पात्रे आहेत. परंतु ‘टेल’चे कथानक मोजक्याच पात्रांभोवती फिरते. टॉमस कालाईल या प्रसिद्ध विचारवंताने लिहिलेल्या ‘द फ्रेंच रिव्हॉल्युशन : ए हिस्टरी’ या ग्रंथावर डिकन्सने ‘टेल’चे कथानक बेतले आहे. कालाईलचे ऋण त्याने ‘टेल’च्या प्रस्तावनेत दिलखुलासपणे मान्यही केले आहे. नाश आणि पुनरुत्थान या चक्रातून इतिहासाचा प्रवास होतो असा कालाईलचा सिद्धांत होता आणि डिकन्सला तो शिरसावंद्य होता.

त्यानुसारच 'टेल'चे कथानक घडत जाते. तथापि नर्मविनोदाबद्दल हातखंडा असलेल्या डिकन्सने 'टेल'मध्ये मात्र या आयुधाचा अभावानेच वापर केला आहे. त्याचे एक कारण म्हणजे मूळ विषयाचे गांभीर्य. पुनरुत्थान आणि मृत्यु (नाश) या संकल्पनांच्या दोन समांतर रुळांवरून 'टेल'चा प्रवास होत राहतो. ख्रिश्चन धर्मात या संकल्पनांना अतीव स्थान आहे. तत्कालीन इंग्लंड आणि फ्रान्समध्ये सामाजिक अत्याचार पैशाला पासरी होते. क्षुल्लक कारणांवरून गरीबांना फासावर चढविण्यात येई. केवळ एखाद्या उमरावाची लहर म्हणून फ्रान्समध्ये निर्धन शेतकरी फासावर चढविण्याचा हुकूम न्यायालय देत असे. इंग्लंडमधील परिस्थिति एवढी भीषण नसली तरी सामंतशहांची राजवट तेथेही अर्निबंध होती. या वस्तुस्थितीचा आधार घेऊनच 'टेल' लिहिण्यास डिकन्स प्रवृत्त झाला. सामाजिक अत्याचारांच्या डिकन्स विरुद्ध होता कारण बालकामगार म्हणून होणारे शोषण त्याने प्रत्यक्ष अनुभवले होते. म्हणूनच आरंभी क्रांतिकारकांबद्दल सहानुभूती दर्शवणारे कथानकानंतर त्यांनी केलेले अत्याचार चव्हाट्यावर मांडताना कचरत नाही. चांगले आणि वाईट यांच्यातील सीमारेषा या कथानकाच्या अतपासून इतिपर्यंत सतत ठळक होत जाते. 'टेल'चे हे बलस्थान आहे.

इंग्लंडमधील भयानक परिस्थितीचे वर्णन करताना डिकन्सची लेखणी अधिक टोकदार होत जाते. दोषी लोकांना फासावर चढवण्याची शिक्षा तत्कालीन इंग्लंडमध्ये सर्रास देण्यात येई. घरफोडी किंवा सहा पेन्स चोरी असले आरोप ठेवून गरीबांना यमसदनी पाठवण्यात येत असे. फ्रान्समध्येही अशाच मनमानी शिक्षा ठोठावण्यात येत. धर्मगुरू समोरून जात असताना वाकून त्यांना अभिवादन केले नाही म्हणून एका मुलाचे हात छाटून त्याला मारून टाकण्यात आले होते. समाजातील सधन वर्गाचे वर्णन करताना डिकन्सच्या लेखणीस वेगळीच धार येते. एका आलिशान इमल्यातील मेजवानीचे वर्णन करताना तेथील प्रतिष्ठितांचा समाचार तो पुढील शब्दांत घेतो, 'निर्लज्ज धर्ममार्तंड... त्यांचे वासनांध डोळे, सैल सुटलेल्या जिभा आणि सुटलेली पोटे.... लष्करी ज्ञानाचा गंधही नसणारे बडे लष्करी अधिकारी आणि काल्पनिक रोगांचा बाजार करून आपली तुंबडी भरून घेणारे डॉक्टर्स.'

डिकन्सच्या लिखाणातून जाणवणारी कळकळ म्हणजे फ्रान्ससारखी क्रांती आपल्या देशात घडू नये; कारण दोन्ही देशांमधील सामाजिक परिस्थिति जवळपास सारखीच होती. तथापि त्याच्या लिखाणाचा रोख होता सरदार-दरकदार वर्गाकडे. जे पेराल तेच उगवेल हा त्याच्या संदेशाचा गाभा होता. गरीब वर्गाचा त्याने स्वतंत्रपणे परामर्श घेतलेला नाही. श्रीमंत वर्गाच्या वागण्याची जशास तशी प्रतिक्रिया उमटेल असा गर्भित इशारा त्याच्या लिखाणात आहे. त्यातून काही विश्लेषकांनी असा अर्थ काढला की डिकन्सची सहानुभूती अमीरांना होती आणि त्यांचे वाईट होऊ नये यासाठीच त्याने 'टेल'चे लिखाण केले.

डिकन्सचे एक प्रेमप्रकरण होते आणि त्याचाही प्रभाव 'टेल'वर जाणवतो, असे काही समीक्षकांचे म्हणणे आहे. लेखनाखेरीज डिकन्स आरंभीच्या काळात नाटकांत कामे करायचा. यापैकी एका नाटकात डिकन्सने रंगवलेले पात्र आपल्या प्रेयसीचे लग्न आपल्याच एका





**मूल्य १८० रुपये**
**सवलतीत १०० रुपये**

## महाराष्ट्राची सुवर्णगाथा

**वसंत वासुदेव देशपांडे**

महाराष्ट्र राज्याची निर्मिती १ मे १९६० रोजी झाली. त्यापूर्वीपासून आजतागायत वसंत (दादा) देशपांडे वृत्तसंकलन करत आहेत. महाराष्ट्र निर्मितीचा सोहळा, महाराष्ट्र विधानसभेचे पहिले अधिवेशन, यशवंतराव चव्हाण यांची भाषणे, सत्ताबदल, आपत्ती व्यवस्थापन आणि संकटांचा मुकाबला अशा विविध अंगांना स्पर्श करत त्यांनी अचूक संदर्भांसह हा ग्रंथ सिद्ध केला आहे. या ग्रंथाची भाषा अथपासून इतिपर्यंत वृत्तपत्रीय आहे. हे लिखाण ललित करण्याचा मोह देशपांडे यांनी टाळला आहे. वृत्तपत्रीय लिखाणात अचूकता, नेटकेपणा आणि कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त माहिती वाचकापर्यंत पोचवणे या तीन घटकांना सर्वाधिक महत्त्व असते. याच तंत्राचा अवलंब देशपांडे यांनी केला आहे.

प्रतिस्पर्ध्याबरोबर व्हावे म्हणून प्राणत्याग करते. अगदी तसाच शेवट 'टेल'मध्येही केल्याचे आढळते. 'टेल'मधील दोघा प्रमुख पात्रांचे चित्रण आणि डिकन्सचे आयुष्यात विस्मयकारक साम्य असल्याचा निष्कर्षही समीक्षकांनी काढला आहे.

अन्य एक महत्त्वाचे निरीक्षण म्हणजे डिकन्सने रंगविलेली सर्व पात्रे एकसुरी आहेत. म्हणजे सुष्ट ते आरंभापासून अखेरपर्यंत सत्प्रवृत्त तर दुष्ट म्हणजे अथपासून इतिपर्यंत कपटी, नीच आणि आगलावे. कोणताही मनुष्यप्राणी सद्गुणांचा अथवा दुर्गुणांचा पुतळा नसतो. प्रत्येकात काहीतरी कमीजास्त असतेच. तथापि याला डिकन्सची पात्रे अपवाद आहेत असा आक्षेप आहे. वाचकांना मात्र कथावस्तुत काहीच खटकत नाही असा कौल या पुस्तकाच्या अखंड खपाने दिला आहे.

सोबतच्या यादीवरून असे दिसून येईल की इंग्रजी ही विश्ववाणी असून जगासमोर जायचे असल्यास तिच्याखेरीज पर्याय नाही. इंग्रजीखेरीज अन्य भाषांमधील पुस्तकेही तडाखेबंद खपली, परंतु त्यांचे भाषांतर इंग्रजीत झाल्यानंतर. त्यातील 'ड्रीम ऑफ द रेड चेम्बर' या चिनी पुस्तकाचा उल्लेख आधीच येऊन गेलेला आहे. अँटॉइन द सेंट एकुपेरी या फ्रेंच लेखकाची लोकप्रिय कादंबरी 'द लिटिल प्रिन्स' इंग्रजीत आल्यानंतर तिचा खप आठ कोटी प्रतींवर गेला. पॉल कोएल्हो याने मूळ पोर्तुगीजमध्ये लिहिलेले 'द अल्केमिस्ट' हे पुस्तक इंग्रजीत येताच त्याचा बोलबाला झाला. गेल्या २० वर्षांत त्याच्या साडेसहा कोटी प्रती खपल्या आहेत. जर्मन भाषेतील 'हेडीज् इयर्स ऑफ वाँडरिंग अॅन्ड लर्निंग' हे जोआना स्पायरीचे पुस्तक १८८० साली प्रथम प्रसिद्ध झाल्यानंतर इंग्रजीत आले आणि त्याचा खप पाच कोटींवर गेला. जे.डी. सालिंजर या प्रामुख्याने समाजापासून दूर आणि प्रसिद्धीपराङ्मुख असलेल्या लेखकाचे 'द कॅचर इन द राय' हे पुस्तक १९५१ साली प्रथम प्रसिद्ध झाले आणि विचक्षण वाचकांच्या गळ्यातील ताईत बनून राहिले ते आजतागायत. त्याचाही खप साडेसहा कोटींच्या घरात आहे. इटालियन भाषेतील 'द नेम ऑफ द रोझ' हे उम्बर्तो उको याचे १९८० मध्ये प्रसिद्ध झालेले पुस्तक महाखपाच्या पुस्तकांच्या यादीत आढळतो. त्याचाही खप पाच कोटींवर गेलेला आहेत. रशियन लेखक निकोलाय ऑस्ट्रॉव्स्की याचे १९३२ मधील 'हाऊ द स्टील वॉज टेम्पर्ड' हे रशियन भाषेतील पुस्तक तत्कालीन सोव्हिएत संघराज्यात तीन कोटींवर खपल्याची नोंद आहे. मात्र यापैकी किती वाचकांनी ते स्वखुषीने घेतले असेल असा प्रश्न मनात येतो.

येथे काही जगप्रसिद्ध पुस्तकांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. लिओ टॉलस्टॉयच्या 'वॉर अॅन्ड पीस' या महाकादंबरीचे मूळ रशियन रूप १८६९ साली प्रसिद्ध झाले. या रशियन आवृत्तीचा खप साडेतीन कोटींपेक्षा जास्त आहे. 'द डायरी ऑफ अॅन फ्रँक' या मूळ डचमधील आणि इंग्रजीत भाषांतरित आत्मकथनाच्या तीन कोटी प्रती खपल्या आहेत. 'गॉन विथ द विंड' (१९३६), 'केन अॅन्ड एबल' (१९७९) अशा पुस्तकांचा खप तेवढाच आहे. गॅब्रिएल गार्झिया मार्केज याच्या 'वन हंड्रेड इयर्स ऑफ सॉलिट्यूड' या मूळ स्पॅनिशमधील कादंबरीचा खप १९६७ पासून आतापर्यंत सुमारे तीन कोटी एवढा आहे.

भारतातील कोणत्याही भाषेतील पुस्तकाचा महाखपाच्या यादीत समावेश नाही. याचा अर्थ असा नव्हे की त्यांना या यादीत स्थान नाही. कोणत्याही गोष्टीची पद्धतशीर नोंद न ठेवणे आणि जागतिक बाजारपेठेबद्दल उदासीन राहणे ही आपली वृत्ती यात कारणीभूत आहे.

**दिलीप चावरे**
patrakar@hotmail.com

जगातील सर्वाधिक खपाची पुस्तके

| पुस्तक | लेखक | मूळ भाषा | प्रथम प्रकाशन | अंदाजे खप |
|---|---|---|---|---|
| १) ए टेल ऑफ टू सिटीज् | चार्ल्स डिकन्स | इंग्रजी | १८५९ | २० कोटी |
| २) द लॉर्ड ऑफ द रिंग्ज | जे.आर.आर. टोलकिन | इंग्रजी | १९५४-५५ | १५ कोटी |
| ३) द हॉबिट | जे.आर.आर. टोलकिन | इंग्रजी | १९३७ | १० कोटी |
| ४) ड्रीम ऑफ द रेड चेम्बर | काओ झुकीन | चिनी | १७५९-९१ | १० कोटी |
| ५) अँड देन देअर वेअर नन् | अॅगाथा ख्रिस्टी | इंग्रजी | १९३९ | १० कोटी |

जगातील सर्वाधिक खपाच्या पुस्तक मालिका

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) हॅरी पॉटर (७ भाग) | जे.के. रोलिंग | इंग्रजी | १९९७-२००७ | ४० कोटी |
| २) गूजबम्पस् (६२ भाग) | आर.एल. स्टाईन | इंग्रजी | १९९२-२०१० | ३५ कोटी |
| ३) पेरी मेसन (८२ पुस्तके) | अर्ल स्टॅन्ले गार्डनर | इंग्रजी | १९३३-१९७० | ३० कोटी |
| ४) बेरेन्स्टेन बेअर्स (३०० भाग) | स्टॅन आणि जॅन बेरेन्स्टेन | इंग्रजी | १९६२-२०१० | २६ कोटी |
| ५) चूझ युवर ओन अॅडव्हेंचर (१८५ भाग) | विविध लेखक | इंग्रजी | १९७९-१९९८ | २५ कोटी |

एका बीजापोटी

# इस्टेटीची वाटणी

## डॉ. उज्ज्वला दळवी

सिकंदर असो की सॉक्रेटिस, रामानुजन असोत की रामन राघव, सचिन असो की शेर्पा तेनसिंग; या साऱ्यांनीच आयुष्यभर एक खजिना नकळत सांभाळला, जनुकांचा खजिना.

इतिहास घडवायची, बदलायची ताकद असते ती याच खजिन्यात! मूळ वारसांचा विचार केला तर असं म्हणता येईल, की या जनुकांची भानगड नसती तर युरोपचा इतिहास थोडा वेगळा झाला असता.

अलेक्सी हा रशियाच्या शेवटच्या झारचा एकुलता एक मुलगा. त्याला जन्मापासूनच एक गंभीर आजार होता. लहानशी जखम झाली तरी रक्त वाहत राही. एवढ्या मोठ्या राज्याचा वारस असला तरी लहान मूलच ते. धावपळ करणारच. गुडघा जरासा आपटला तरी आतल्या आत रक्तस्राव होऊन टुम्म सूज येई; असह्य ठणका लागे. त्याच्या सततच्या आजारामुळे झार जेरीला आला होता. त्यामुळे साहजिकच त्याचं राज्यकारभाराकडे पूर्ण दुर्लक्ष झालं. प्रजेचे हाल झाले.

याचा जनुकांशी काय संबंध?


इंग्लंडची राणी व्हिक्टोरिया ही अलेक्सीची पणजी. तिच्या पेशींमध्ये या रक्तस्रावाचं कारण ठरणारं जनुक होतं. तिच्याकडून ते तिच्या मुलींना आणि नातींना मिळालं. अलेक्सीची आई अलेक्झांड्रा ही तिची एक नात. राजकन्याच होत्या त्या साऱ्या. त्या लग्न होऊन युरोपमधल्या वेगवेगळ्या राजघराण्यांत गेल्या. जाताना स्त्रीधन म्हणून ते जनुक सोबत घेऊन गेल्या. त्यांच्या मुलांना, जर्मनी, स्पेन, आयर्लंड, रशिया अशा अनेक देशांच्या वारसांना हे राजसी दुखणं निगुतीनं पोचवलं गेलं.

या राजकन्यांना स्वतःला काही त्रास झाला नाही का? या आनुवंशिक दोषाचं वाटप कसं झालं? एकूणच वडिलोपार्जित गुणदोषांची वाटणी कशी होते?

असं धरून चालू की एका राजाकडे हिरे-माणकांची पुंजी आहे आणि राणीकडेही तेवढ्याच हिरे-माणकांनी भरलेला बटवा आहे. त्यांच्या या संपत्तीची चार राजकुमारांत समान विभागणी करायची असली तर प्रत्येक राजकुमाराला राजाकडून त्याचा चौथा हिस्सा आणि राणीकडूनही चौथाच हिस्सा मिळेल. सगळी वाटणी झाली की राजा-राणी कफल्लक होतील.


आनुवंशिक गुणांचं वाटप मात्र असं होत नाही. निसर्ग हा अतिशय उदार किमयागार आहे. प्रत्येक मुलाला आईच्या गुणसूत्रांपैकी अर्धी आणि वडिलांच्या गुणसूत्रांतली अर्धी मिळतात. तरी कुणाला काही उणं पडत नाही. इतकंच नव्हे, तर वाटणीच्या अखेरीला आईवडिलांकडचा गुणांचा साठा जराही कमी होत नाही. ती द्रौपदीची थाळी ओतप्रोतच राहते.

---



जोहान ग्रेगोर मेंडेल हा ऑस्ट्रियन धर्मगुरू होता. त्याने चर्चच्या आवारात आपले सर्व प्रयोग केले. सत्तर निरनिराळ्या झाडांमध्ये त्याने दोनशे सत्त्याऐंशी संकर केले. त्यासाठी अठ्ठावीस हजार वाटाण्याची झाडे वापरली. मेंडेलने गुळगुळीत हिरवे वाटाणे व खडबडीत पिवळे वाटाणे यांचा संकर करून नानाविध प्रयोग केले. प्रथम त्याने खडबडीत वाटाण्यांचे परागकण घेऊन गुळगुळीत गोल वाटाण्यांवर शिंपडून ते फलित केले. या दोघांच्या संकरातून निर्माण झालेले वाटाणे गुळगुळीत गोल होते. म्हणजे, या वाटाण्यांनी आपल्या आईवडिलांचे अर्धे-अर्धे गुण उचलले नाहीत, तर एकाच पालकाचे गुण स्वीकारले. मेंडेलने या दुसऱ्या पिढीतले वाटाणे गोळा केले आणि ते पेरले. यावेळी मात्र या वाटाण्यांना स्वयंफलित होऊ दिले. यावेळी तिसऱ्या पिढीतले वाटाणे खडबडीत आणि गुळगुळीत, दोन्ही प्रकारचे होते. मात्र खडबडीत वाटाण्यांच्या तिप्पट वाटाणे (एका गुळगुळीताला तीन खडबडीत) मिळाले होते.

---




**वंशावळीच्या तक्त्यांत पुरुष दर्शवायला चौकोन वापरले आहेत आणि स्त्रिया दाखवायला वर्तुळं. ज्या आकृत्या भरीव काळ्या आहेत त्या खळ्या असलेली मंडळी दर्शवतात. इथे दाखवल्याप्रमाणे शिरजोर गुणतत्वाचा परिणाम प्रत्येक पिढीत दिसतो.**

ग्रेगोर मेंडेल या ऑस्ट्रियन धर्मगुरूनं हिरवे टपोरे वाटाणे आणि पिवळे सुरकुतलेले वाटाणे यांचे तऱ्हेतऱ्हचे संकर करून या वाटणीचे सोपे नियम एकोणिसाव्या शतकातच शोधून काढले होते. ते वाटाण्यांमधल्या वाटणीचे नियम माणसांच्या दर्शनी गुणांनाही लागू होतात.

प्रत्येक मुलाच्या वाट्याला आईवडिलांकडून गुणांचा प्रत्येकी अर्धाअर्धा हिस्सा येतो. त्यातल्या गुणांची निवड अडमतडम करून झालेली असते. प्रत्येक मुलापाशी आईची अर्धी गुणसूत्रं आणि वडिलांची अर्धी असा ठेवा जमतो. या मिश्र ठेव्यातून तसाच अडमतडम अर्धा हिस्सा प्रत्येक नातवंडाला पोचवला जातो.

या ठेव्यातली गुणतत्त्वं उंची, त्वचेचा रंग, डोळ्यांचा रंग, इत्यादी दर्शनी गुण (फिनोटाइप) तर ठरवतातच, शिवाय शरीरातल्या सगळ्या घडामोडीदेखील त्यांच्याच नियंत्रणाखाली असतात. दर्शनी गुणांचा एकेक पैलू ठरवणारे किंवा एकेका कामाचा ठेका घेणारे जे गुण असतात त्यांतला एक गुण आईकडचा आणि एक वडिलांकडचा असतो. या सारख्या गुणांना भिडूगुण (ॲलिल्स) म्हणतात. अशी एकेक जोडी एक काम करते. उदाहरणार्थ, डोळ्यांच्या रंगाचे गुण. आईकडून घाऱ्या डोळ्यांचा आणि वडिलांकडून काळ्या डोळ्यांचा असे गुण आलेले असले तर ते दोन्ही मिळून मुलाच्या डोळ्यांचा रंग ठरवतात. बहुतेक वेळा तीन-चार जोड्या मिळून एकच काम बघतात. मधुमेह, रक्तदाब, वगैरे मातब्बर रोग होणार की नाहीत हे ठरवायला तर या भिडूंच्या बऱ्याच जोड्यांचा हातभार लागतो.

या भिडूंतले काही हिऱ्यांसारखे प्रभावी, सतत वर्चस्व गाजवणारे शिरजोर (डॉमिनंट) असतात. तर दुसरे काही माणकांसारखे असतात. ते शेजारी हिरा आला की तुलनेनं निस्तेज ठरतात. ते नेहमी पड खाणारे, मवाळ (रिसेसिव्ह), कमजोर गुण. हिरा-माणिक भिडू म्हणून आले की हिऱ्याचंच रूप उठून दिसतं. पण जर दोन कमजोर गुण म्हणजे माणकं एकत्र आली तर मात्र त्यांची लाली खुलते.


गालाला खळी पडणं हे शिरजोर गुणाचं काम आणि ती न पडणं हे कमजोर गुणाचं. आईवडिलांकडचे जर प्रत्येकी दोन शिरजोर गुण आले (होमोझायगस) तर चारी मुलांना खळी पडते.

आई किंवा वडील यांपैकी एकाच्याच गालावर खळी पडत असली तर चार मुलांपैकी दोघांना तरी खळी पडायची शक्यता असते. एकच शिरजोर भिडू हजर असला की पुरतं.

आईवडिलांपाशी असा प्रत्येकी एकच गुण असला (हेटरोझायगस) तर त्या दोघांनाही खळी पडतेच, शिवाय चार मुलांपैकी तिघांना खळी पडू शकते. प्रत्येक पिढीत ही खळी कुणाच्याना कुणाच्या गालांवर दिसते. एकाच गुणाच्या, भिडू जनुकांच्या जागाही एकसारख्या, ठरावीकच असतात.

भिडलेल्या भुवया हे कमजोर गुणांचे उदाहरण. यातला एकच भिडू असला तर तो गुण सुप्तच राहतो. पण आईवडील दोघांच्याहीकडून सुट्या भुवया देणारा एकही शिरजोर न येता फक्त भिडलेल्या भुवया देणारा एकेक कमजोर गुण आलेला असला, तर या दोन कमजोर गुणांच्या एकजुटीमुळे अपत्याच्या भुवया एकमेकींना भिडतात. अपत्याला भिडणाऱ्या भुवयांचा एकच गुण मिळाला (कॅरियर) तर त्याच्या स्वतःच्या भुवया सुट्या राहतात खऱ्या, पण पुढे त्याच्या बायकोपाशीही जर तसा एकच गुण असला तर त्या दोघांच्या बाळांपैकी एकाच्या भुवया भिडलेल्या असू शकतात.

हे सारं कसं व्हावं याची गणितं आहेत. त्यासाठी शास्त्रज्ञांनी आखीव चौकटीतली




**कमजोर तत्वांचे दर्शनी गुण प्रत्येक पिढीत दिसून येतातच असे नाही.**

| | G | g |
|---|---|---|
| G | GG | Gg |
| g | Gg | gg |

**यात G हे शिरजोर गुणतत्व आणि g हे कमजोर गुणतत्व आहे. आई आणि वडील दोघांपाशी एक शिरजोर आणि एक कमजोर गुण असला तर मुलांच्यात वाटणी कशी होते ते या तक्त्यात दाखवलं आहे.**

सूत्रं ठरवली आहेत.

पण जीवशास्त्र असं चौकटीत बंदिस्त होत नाही. तिथे ती गुणांची अडमतडम निवड आडवी येते. खळीचे गुण कुणाला कसे मिळतील हे शेवटी कर्मधर्मसंयोगावर अवलंबून असते. शंभर टक्के भाकीत कशाचंही मांडता येत नाही. त्यात पुन्हा सध्याच्या हम दो, हमारा एक काळात 'चार बाळां'ची गणितं कुणी करावी? पण जीवशास्त्रात पहिला, चौथा अशी क्रमवारी नसते. कधी एकुलत्या एका बाळाला दोन माणकं मिळून जातात. कधी तसं चौथ्या पिढीत होतं आणि पणजीच्या भिडणाऱ्या भुवया सरळ नातवाच्या बाळातच दिसतात.

पण आईबाबांच्या गालांवर खळी नसली तर ती कुठल्याही बाळाला मिळणं फार कठीण. (पुन्हा जीवशास्त्र! अशक्य म्हणता येत नाही!)

अंडाकृती चेहरा, बदामाच्या आकाराचे डोळे, जाड भुवया, लांब पापण्या ही शिरजोर गुणतत्त्वं तर गालापाशी चिकटलेल्या कानाच्या पाळ्या, गोलाकार डोळे, भरघोस केस ही कमजोर गुणतत्त्वं आहेत. बहुतेक वेळा यांतही एकाहून अधिक जनुकांचा वाटा असतो. एक गमतीचं गुणतत्त्व आहे, कडू चव समजण्याचं. हा शिरजोर गुण ज्यांच्यापाशी असतो त्यांना कोबीसारख्या भाज्या कडवट लागतात! त्यांना तंबाखूचा कडवटपणा इतका नकोसा होतो की त्यामुळे सिगारेटचं व्यसन लागणं कदापी शक्य नसतं.

काही समतोल मित्रगुण(को-डॉमिनंट) समझोत्यानं एकत्र काम करतात. त्यांना मोती आणि पाचू म्हणूया. ते एकत्र आले तर त्या दोघांचीही रंगत दिसून येते.

उदाहरणार्थ, रक्तगट A किंवा B यांचे गुण O या कमजोर गटाबरोबर असले तर शिरजोर असतात. पण तक्त्यात दाखवल्याप्रमाणे जेव्हा आईकडून A आणि वडिलांकडून B असं मिश्रण मिळतं तेव्हा बाळाचा रक्तगट AB असा संमिश्र होतो.

त्यातून निसर्गाच्या खोड्या चालूच असतात.

कधी हिऱ्याचं कोंदण असं फसवं केलेलं असतं की त्याचं तेज पार झाकोळतं. अशा वेळी कमजोर माणिक उठून दिसतं (व्हेरिएबल पेनिट्रन्स). अशा वेळी आईबाबांच्या गालांना खळ्या असूनही बाळाच्या गालावर खळी येत नाही. कधी माणकाच्या जागी एखादा स्वयंभू हिरा उपजतो (म्युटेशन) आणि आईबाबांच्या गालाला नसलेली खळी बाळाच्या गालावर उमटते.

कशासाठी करायची ही खळ्यांची खळखळ?

ही खळखळ खळ्यांसाठी नव्हे, खलांसाठी, दुष्ट रोगांसाठी करायची.


विल्सन डिसिज (Wilson Disease) हा मज्जासंस्थेला आणि यकृताला घातक असलेला आजार निदान आनुवंशिकतेच्या बाबतीत कमजोर असतो.

काही माणसं जन्मतःच पांढरीफेक गोरी असतात. त्यांचे केस आणि डोळेही फिकट किंवा रंगहीन असतात. हा त्यांचा पांढरेपणाही (अल्बिनिझम) कमजोर गुणसूत्रांमुळे येतो.

रक्तातलं कोलेस्टेरॉल वाढवण्याची प्रवृत्ती शिरजोर असते. हंटिंग्टन्स कोरिया (Huntington's chorea) हा मज्जासंस्थेचा गंभीर आजारही शिरजोर गुणतत्त्वांचा आहे. तो वयाच्या चाळिशीनंतरच दिसून येतो. तोवर मुलंबाळं झालेली असतात. कठोर हिऱ्यांचं जीवघेणं वाटप त्यांना झालेलं असतं. पुढच्या पिढ्याही रोगग्रस्त होत राहतात.

व्हिक्टोरिया राणीची गोष्ट तर आणखीच वेगळी होती. कशी ते पाहू.

आपल्या पेशींमध्ये जी जनुकं असतात ती डीएनएची बनलेली असतात. हा डीएनए टेपरेकॉर्डरच्या टेपसारखा असतो. ही टेप वाचून पेशींचं काम चालतं. ही टेप उलगडून ताणली तर ती एकूण तीन मीटर म्हणजे




**या वंश-तक्त्यात भरीव काळा रंग रक्तगट A चा आणि रेषारेषांचं क्षेत्र रक्तगट Bचं आहे. ज्या मुलांना दोन्ही गुणतत्त्वं मिळाली त्या मुलांचा रक्तगट AB झाला.**


मर्सिडीज गाडीएवढी लांब असते. तिचे घट्ट गुंडे करून ते क्रोमोसोम नावाच्या गुणसूत्रांवर, कुठे दाट ठासून, तर कुठे विरळ असे बसवलेले असतात. ही गुणसूत्रं म्हणजे जनुकांचं भांडारच असतं म्हणा ना! या साऱ्या दीर्घसूत्री गुंत्यातही प्रत्येक गुणाच्या जनुकाची जागा ठरलेली असते. ती कधीही चुकत नाही.

एका पेशीत किती क्रोमोसोम असतात ते ती पेशी माशीची आहे, माशाची आहे, की माणसाची यावर अवलंबून असतं. चिलटात आठ क्रोमोसोम असतात, बटाट्यात चोवीस, कांद्यात बत्तीस, तर कोलंबीत शहाऐंशी असतात. प्रत्येक सर्वसाधारण पेशीत दोन-दोन क्रोमोसोमच्या एकसारख्या जोड्या असतात. म्हणून या डिप्लॉइड पेशी. माणसाच्या एका पेशीत क्रोमोसोम असतात. त्यांच्या दोन-दोनच्या २३ जोड्या असतात. किंवा  क्रोमोसोमचे दोन गट असतात.

आपण सारे एकपेशीय म्हणून जन्मलो. मग त्या एका पेशीच्या एक कोटी कोटी पेशी कशा झाल्या?

पेशींचं पुनरुत्पादन होताना त्या दुभंगतात. एका डिप्लॉइड आईपेशीच्या दोन डिप्लॉइड कन्यापेशी होतात. अशा एकीच्या दोन, दोघींच्या चार करत एक कोटी कोटी होतात. दुभंगण्यापूर्वी पेशींना तयारी करावी लागते. त्यांच्यातला डीएनए त्यावेळी सैलावतो, बटबटीत होतो. त्यांच्या २३-२३च्या दोन संचांतल्या प्रत्येक क्रोमोसोमची दोन उभी, हुबेहूब शकलं होतात. आईपेशीत काही काळ २३-२३चे चार संच तयार होतात. यामुळे दुभंगल्यावर प्रत्येक कन्यापेशीला २३-२३चे दोन संच मिळतात. या विभाजनाला मायटॉसिस असे म्हणतात.


मायटॉसिसच्या वेळचा बटबटीत डीएनए प्रयोगशाळेतल्या रसायनांनी गडद रंगतो. क्रोमोसोमच्या अभ्यासाला (Karyotyping ला) हेच पाहिलं जातं. म्हणून त्याला रंगद्रव्य क्रोमॅटिन (chromatin) असं नाव पडलं. क्रोमोसोम म्हणजे रंगसूत्र किंवा



**मायटॉसिसमध्ये होणाऱ्या विभाजनाचा नमुना.**

रंगपट्टी. तिच्यावर डीएनएच्या दाट आणि विरळ रचनेप्रमाणे फिकट आणि गडद असे रंगांचे पट्टे दिसतात.

आणखी एका प्रकारचं विभाजन होतं. त्याला मियॉसिस (meiosis) म्हणतात. यात डिप्लॉइड मातृपेशी दुभंगून दोन कन्यापेशी तयार होतात. या कन्यापेशींतले क्रोमोसोम दुभंगत नाहीत. आणि तरीही प्रत्येक



**मियॉसिसचा नमुना.**
**चारी नातपेशी  haploid आहेत.**

कन्यापेशीच्या दोन नातपेशी होतात. या नातपेशींत प्रत्येकी २३च क्रोमोसोम असतात. म्हणजे नेहमीपेक्षा निम्मे. अशा पेशींना हॅप्लॉइड (haploid) पेशी म्हणतात.

स्त्रीबीजं आणि पुंबीजं या पद्धतीने तयार होतात. वडिलांकडून येणारं पुंबीज(शुक्रतंतू) असं २३च क्रोमोसोम घेऊन येतं. आईच्या बीजांडातही ते २३च असतात. हे दोन्ही हॅप्लॉइड मिळून जेव्हा फलित अंडं तयार होतं तेव्हा त्यात पुन्हा २३+२३=४६ क्रोमोसोम (diploid cell) होतात.

हे फलित बीजांडं mitosis विभाजनानं द्विगुणित होत जातं आणि कित्येक कोटी पेशींचं बाळ जन्माला येतं.

ढोबळ पाहिलं तर यांतला एक २३चा गट आईकडून आणि दुसरा वडिलांकडून आलेला असतो. त्यामुळे भावंडं सारखी दिसली तर नवल नाही. पण आईबापांच्या मूळ २३ जोड्यांमधून प्रत्येक जोडीतला अडमतडम एक निवडायचा तर ८४  लाख प्रकारचे संच मिळू शकतात. यांच्यावर ठासून बसवलेल्या गुणसूत्रांच्या गुंत्यातले किती शिरजोर (डॉमिनंट) गुण आईकडून आले आणि किती वडिलांकडून आले यावर मूल आईवर गेलं की वडिलांवर ते ठरतं. निवडीत इतकं वैविध्य असल्यामुळेच बहीणभावंडांच्या आनुवंशिक गुणांत शेकडो-हजारो छटा असतात. सारख्या दिसणाऱ्या जुळ्यांची गोष्ट वेगळी. त्यांच्यात आधी ४६चा पूर्ण संच निवडला जातो आणि मग त्याच्या दोन हुबेहूब प्रतिकृती बनतात. त्यांच्या तेवीसही जोड्या अगदी एकसारख्या असतात.

आपल्या क्रोमोसोमच्या तेवीसांपैकी बावीस असतात साधारण जोड्या. डाउन्स सिन्ड्रोममध्ये (Down's syndrome) मुलांना आईकडून चुकून २१ क्रमांकाचे एकाऐवजी दोन क्रोमोसोम मिळतात. शिवाय वडिलांकडूनही एक एकविसावा क्रोमोसोम मिळतो. या एकविसाच्या तिप्पट डोसामुळे पेशींचा गोंधळ उडतो.  त्यामुळे अशा मुलांच्यात हृदय, डोळे, कान वगैरेंचे विकार

असू शकतात. मंदमतीचं प्रमाणही बरंच असतं. १३ किंवा १८ क्रमांकाचा क्रोमोसोम अधिक आला तर ते मूल इतकं विकृत जन्मतं, की ते फार तर काही महिने जगू शकतं.

क्रोमोसोमची तेविसावी जोडी Y आणि X ची. हे 'यक्ष' लिंगभेद ठरवतात. यांतला Y अर्धामुर्धाच असतो. पण तो पौरुषाचं प्रतिनिधित्व करतो. पुरुषांच्यांत ही जोडी XY अशी असते. Y छोटासा, अर्धवट असल्यामुळे पेशीच्या कामकाजात X चाच वरचष्मा असतो. त्याच्यावरची कमजोर गुणतत्त्वंसुद्धा कामकाजावर आपली छाप पाडतात. स्त्रियांमध्ये ही तेविसावी जोडी XX असते. ती मात्र समतोल असते. त्यामुळे कमजोर-शिरजोर भिडूंचे नेहमीचे नियम तिथे लागू पडतात.

अडमतडम करून या दोहोंपैकी एका X ला केंद्राच्या कडेला आराम करत बसवलं जातं. तो स्त्रियांचा रिकामटेकडा X सूक्ष्मदर्शकाखाली दिसतो. त्याला 'बार बॉडी' असं नाव आहे. ऑलिम्पिक खेळात खेळाडूंचं स्त्रीत्व ठरवायला त्याचाच शोध घेतला जाई. काही खेळाडूंवर त्यामुळे अन्याय झाला. तेव्हापासून बार बॉडीला पर्याय शोधले गेले.

व्हिक्टोरिया राणीकडचं ते रक्तस्रावाचं जनुक एका X वरचं होतं. ते कमजोर होतं. ज्या मुलग्यांकडच्या अर्ध्या हिश्श्यात तो X आला त्यांना वडिलांकडून Y मिळाला होता. पेशींच्या कारभारात X वरचढ. म्हणून जरी त्यावरचं जनुक कमजोर होतं तरीही या पुरुषांना रक्तस्रावाचा त्रास झाला. तिच्या मुलींना आणि नातींनाही असा X मिळाला. पण त्यांना वडिलांकडून मिळालेल्या दुसऱ्या X वर, जखमेचं भळभळणं थांबवणारं शिरजोर गुणतत्त्व होतं. त्याच्या वर्चस्वामुळे त्या स्त्रियांना त्रास झाला नाही. त्या फक्त त्या जनुकाच्या वाहक झाल्या. त्यांच्या ज्या मुलग्यांना तो रक्तस्रावाचा X मिळाला त्यांना मात्र पुन्हा त्रास झालाच. व्हिक्टोरियाचे मुलगे, नातू आणि पणतू अल्पायुषी झाले.


---

या लेखात राजसी, मानवी जनुकांचा विचार झाला. पुढल्या लेखात आपण स्वाइन फ्लू, एड्स् यांसारख्यांच्या तामसी, अमानुष जनुकांबद्दल बोलणार आहोत.

---

रंगांधळेपणाही असाच X वरचा कमजोर भिडू, फक्त पुरुषांना सतावणारा असतो.


वंशावळीचा इतिहास माहीत असला की पुढच्या पिढीत ते रोग होण्याची शक्यता किती याचे आडाखे बांधता येतात. ते त्यातल्या त्यात टाळायचे प्रयत्न करता येतात. या गोष्टींना आवर घालण्यासाठी, जमलं तर त्यावर उपाय शोधण्यासाठी शास्त्रज्ञ हा अभ्यास करतात.



**X शी निगडित कमजोर गुणतत्व फक्त मामा-भाच्यांच्यात दर्शनी होतं.**

व्हिक्टोरियाच्या रक्तरंजित राजसी जनुकामुळे नेमकं कुठलं प्रथिन (protein) कमी पडत होतं ते अर्धशतकापूर्वीच कळलं होतं. ते मानवी रक्तसाठ्यातून वेगळं काढून रोग्यांना देणंही जमलं होतं. पण त्यात बऱ्याच कटकटी होत्या. आता जंतूंच्या डीएनएकडून जंतूंच्याच पेशींत ते बनवून घेता येतं. ते गरजेला लागेल तेवढं मिळूही शकतं. ही सोय व्हिक्टोरिया राणीच्या काळात असती तर युरोपच्या बऱ्याच देशांना वेगळेच राजे लाभले असते. कदाचित लाल बावटयाची, रशियातली रक्तरंजित राज्यक्रांती टळली असती. जगाचा इतिहास वेगळ्या रंगात लिहिला गेला असता.

**डॉ. उज्ज्वला दळवी**
ujjwalahd9@gmail.com




## सोन्याच्या धुराचे ठसके

पावशतकी सौदी अनुभव

**डॉ. उज्ज्वला दळवी**

सौदी अरेबियासारख्या अत्यंत प्रतिकूल हवामानाच्या, कट्टर इस्लामी राज्यात उपेक्षा, अन्याय नि हालअपेष्टा सहन करत, आयुष्यातील उमेदीची पंचवीस वर्षे वास्तव्य करणाऱ्या डॉ. उज्ज्वला दळवी यांनी त्या देशाच्या अंतरंगात शिरून, ते उकलून आपल्यापुढे ठेवले आहे. आपण वाचकांनी त्याबद्दल त्यांचं कृतज्ञ असायला हवं. **– मीना प्रभू**

**मूल्य २७५ रुपये, सवलतीत १६० रुपये**

# ‘जळगावरत्न’ भवरलाल जैन

## दिनकर गांगल

उद्योगपती भवरलाल जैन ह्यांना ‘जळगावरत्न’ पुरस्कार देण्याचा समारंभ त्या नगरीच्या बालगंधर्व खुल्या रंगमंचावर दिमाखात परंतु हृद्यपणे पार पडला. नियोजन मंडळाचे सदस्य व लेखक नरेंद्र जाधव, चित्रपट-नाट्य दिग्दर्शक जब्बार पटेल व कविराज ना.धों. महानोर यांची प्रमुख उपस्थिती यावेळी होती. पुरस्कार जळगाव नगरपालिकेतर्फे देण्यात आला. त्यामुळे महापौर प्रदीप रायसोनी, आयुक्त प्रकाश बोकडे व महापालिकेतील विरोधी पक्षनेते गणेश सोनावणे यांचे व त्यांच्या सहकाऱ्यांचे रंगमंचावरील स्थान प्रतिष्ठित होते. त्याशिवाय, जळगावातील प्रतिष्ठित नागरिक, लोकप्रतिनिधी, विरोधी पक्षनेते एकनाथ खडसे व पालकमंत्री गुलाबराव देवकर आणि विविध राजकीय छटांचे कार्यकर्ते असे अडतीस जण व्यासपीठावर होते. त्यांपैकी बारा-चौदा जणांची तरी समयोचित, समर्पक व नेमकी भाषणे झाली. सहसा, कोणी मुद्दा वगळाच; वाक्प्रयोग वा शब्दप्रयोगदेखील पुनरूद्धृत केले नाहीत. सभेच्या सर्वोच्च उत्कट भावुक क्षणी जळगावचे आमदार सुरेशदादा जैन म्हणाले, की भवरलालला मी मोठा भाऊ मानतो म्हणून नव्हे, पण मला खरोखर असे वाटते, की त्यांना जळगावरत्न काय, महाराष्ट्ररत्न काय, भारतरत्न पुरस्कार मिळायला हवा! त्यांच्या ह्या वाक्यावर उपस्थित अडीच-तीन हजार लोक आणि व्यासपीठावरील चाळीस मान्यवर यांनी कडाडून टाळ्या वाजवल्या.

त्यानंतर क्षणार्धात, सारे सभागृह अंतर्मुख झाले आणि मग तेच सभागृह मनोमन, हा उद्गार अतिशयोक्त असला तरी समयोचित आहे अशा निर्णयाप्रत आले असावे, कारण नंतरच्या वक्त्यांनी भवरलाल यांच्या व्यक्तिमत्त्वांचे व गुणविशेषांचे वर्णन व विश्लेषण करताना शब्द, विशेषणे व वाक्प्रयोग यांची चढती कमान ठेवली. सभाध्यक्ष नरेंद्र जाधव यांनी, मानपत्रातील उल्लेखांच्या आधारे भवरलाल यांच्यावर गुणश्रेष्ठतेची बरसातच केली. सभेच्या आरंभी कोणी स्थानिक वक्त्याने, भवरलाल व अंबानी हे आपले आदर्श आहेत असा उल्लेख केला होता. त्याचा समाचार घेताना जाधव यांनी अंबानी यांचे नाव न घेता उत्तमरीत्या सांगितले, की त्यांची अडीच लाख कोटी रुपयांची संपत्ती व भवरलाल यांची चार-पाच हजार कोटी रुपयांची संपत्ती, हे दोन्ही आकडे, त्यांत खूप मोठी तफावत असली तरी सर्वसामान्य माणसापासून सारखेच दूर आहेत, एवढेच त्या दोघांमध्ये साम्य आहे असे म्हणता येईल. परंतु त्या अतिश्रीमंत उद्योगपतीने आपल्या पत्नीच्या वाढदिवशी आठ कोटी रुपयांची गाडी घेतली तर भवरलालजींनी पत्नीच्या स्मृतीनिमित्ताने ‘ती आणि मी’सारखे हृद्य पुस्तक लिहिले. हा त्या दोघांमधील संस्कृतीचा आणि गुणवत्तेचा फरक आहे आणि याबाबतीत भवरलाल इतर अनेक उद्योजकांपेक्षा कितीतरी सरस ठरतात! जब्बार पटेल यांनी, भवरलाल यांची दृष्टी म. गांधी, नेहरू व जे.आर.डी. टाटा यांच्या जीवनादर्शातून घडली असे सांगितले.

अशा गौरवप्रसंगी सर्व भाषणे उत्सवमूर्तीच्या प्रशंसेची होणे स्वाभाविक आहे, परंतु ‘जळगावरत्न’ पुरस्कार प्रसंगात सच्चेपणा, पारदर्शकता, आत्मीयता व उत्कटता होती. ती जशी वक्त्यांत होती तशी श्रोत्यांत होती. व्यासपीठावरच्या विविध बोलण्याचा प्रत्यय त्यांपैकी जवळजवळ प्रत्येकाने घेतला होता व त्यामुळे श्रोत्यांना वारंवार गलबलून जायला होत होते. विशेषत: स्थानिक डॉक्टर अविनाश आचार्य यांनी, भवरलाल दोन वेळा कसे खंबीरपणे त्यांच्यापाठी उभे राहिले ते प्रसंग थेट निवेदन केले. ते इतके हृदयस्पर्शी होते की त्यांना उपमा-अलंकार-विशेषणे यांची गरज भासली नाही. जळगावातल्या अनेकांना असे अनुभव आले आहेत.

भवरलाल जैन यांच्या या गौरवाला विशेष महत्त्व लाभले ते त्यांच्या उद्योगासंबंधात अलिकडे घडलेल्या दोन घटनांनी. एक म्हणजे अमेरिकेतील बोस्टनच्या हार्वर्ड स्कूल ऑफ बिझनेसने जैन उद्योगाची विशेष अभ्यासासाठी निवड केली आहे. स्कूलने त्या आधी भवरलाल जैन यांचा ऑडियो व व्हिडियो इंटरव्ह्यू घेतला. तो सुद्धा तेथील प्रोफेसर एमिरेटस, चौऱ्यांशी वर्षांचे रे गोल्डबर्ग यांनी. त्यांनी त्या मुलाखतीत भवरलाल यांना सर्टिफिकेट देऊन टाकले, की एवढ्या निर्मितीशील मनाचा माणूस आपण आयुष्यात पाहिलेला नाही! त्यानंतर भवरलाल यांचे चिरंजीव, कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक अनिल जैन व जळगावचे दोन प्रयोगशील शेतकरी यांना बोस्टन येथे पाचारण केले गेले आणि आता स्कूलचा अभ्यास गट भारतात येऊन जैन उद्योगाच्या यशाची मांडणी करणार आहे -




**महानोर, जब्बार पटेल, नरेंद्र जाधव यांच्या हस्ते भवरलाल जैन यांना 'जळगावरत्न' अर्पण**

स्कूलच्या अभ्यासाचा भाग म्हणून.

दुसरी घटना म्हणजे लंडनच्या 'फायनान्शियल टाइम्स'ने त्यांच्या वार्षिक पुरस्कारासाठी जागतिक जे आठ उद्योग निवडले, त्यांमध्ये पर्यावरण विभागात जैन इरिगेशन सिस्टिमचा समावेश झाला. जगातल्या 'ॲपल' वगैरेसारख्या कंपन्या या मान्यवरांत आहेत. अनिल जैन तो पुरस्कार घेऊन नुकतेच परतले.

भवरलाल यांच्या चार मुलांनी- अशोक, अनिल, अजित व अतुल - आधीच कंपनीचा कार्यभार समर्थपणे हाती घेतला आहे व त्यांच्या मोठमोठ्या उड्या आहेत. परंतु वडिलांना मिळालेल्या 'जळगावरत्न' पुरस्कारानिमित्ताने मुलांनी जो मोठा देकार केला आहे त्यातून त्यांचे संस्कार दिसतात. मुलांच्या वतीने, भवरलाल यांनी उत्तरादाखल भाषणात जाहीर केले, की कंपनीमध्ये जैनांचा जो बत्तीस टक्के वाटा आहे त्याच्या पंचाऐंशी टक्के रक्कम दरवर्षी समाजकार्यार्थ देण्यात येईल! बिल गेट्स व वॉरन बफे या दोन अमेरिकन उद्योगपतींनी सध्या उद्योगधंद्यांची सामाजिक जबाबदारी व कंपन्यांच्या उदार देणग्या (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी व कॉर्पोरेट फिलाँथ्रॉफी) यांबाबत जगभर जोरदार मोहीम चालवली आहे. भवरलाल जैन यांच्या चार मुलांनी आपल्या संपत्तिदानाची घोषणा करून केवढे जबरदस्त उत्तर गेट्स व बफे यांना दिले आहे!

भवरलाल यांचे उत्तरादाखल भाषण हृद्य, समर्पक व आर्त होते. त्यांनी आपले काका दलुभाई, इतर कुटुंबीय, कंपनीतील सहकारी (त्यांना ते कर्मचारी म्हणत नाहीत) व सर्वात महत्त्वाचे म्हणजे मित्र यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. वेगवेगळया भाषणांमधून झालेल्या कौतुकासंबंधात ते म्हणाले, की तो सबंध वेळ मला कानावर हात दाबून बसावेसे वाटत होते. आयुष्यात पुरेशी प्रशंसा झाली आहे, ती आता नको. त्यामुळे असेही वाटत होते, की भाषणांमधून आपल्या अंगात आणखी गुण काय हवे याबद्दलच्या सूचना मिळत आहेत. आपण उरलेल्या आयुष्यात ते अंगी बाणण्याचा प्रयत्न करत राहू. त्यांचे भाषण संथ लयीत श्रोत्यांवर उचित परिणाम साधत गेले. ते संपले तेव्हापर्यंत सभेचे साडेतीन तास उलटून गेले होते! तोपर्यंत सर्व श्रोते औत्सुक्याने बसून होते.

सभेमध्ये महानगरपालिकेखेरीज कोणालाच भवरलाल यांचा हारतुरे अर्पून सत्कार करण्याची मुभा ठेवली नव्हती. तथापी आयत्या वेळी सातपुड्यातील आदिवासींचे प्रतिनिधी धनुष्यबाण घेऊन आले व त्यांनी ते भवरलाल यांना अर्पण केले. तो क्षण हृदयस्पर्शी होता. एका उद्योगपतीचा सत्कार आदिवासींकडून!

सभेत इतक्या वक्त्यांची भाषणे होत असताना थोडे कमीजास्त स्थानिक संदर्भ येत. श्रोत्यांना ते स्वाभाविक वाटले कारण सभा महापालिकेने योजली होती. परंतु एकनाथ खडसे (नाथाभाऊ) बोलण्यास उभे राहिले तेव्हा वेगळेच औत्सुक्य होते, कारण सुरेशदादा जैन यांनी अलिकडेच त्यांच्यावर भ्रष्टाचाराची तोफ डागली होती. खडसे यांनी एक-दोन चिमटे काढले, परंतु त्यांचे भाषणदेखील प्रत्ययकारी होते. आपल्या वडिलांनी आपल्या चार भावांना कष्टमय परिस्थितीत कसे शिकवले याचे वर्णन करून खडसे म्हणाले, की नंतर आम्हाला बरे दिवस लाभले याचे कारण आम्ही जैन ठिबक सिंचन यंत्रणा शेतीत लावली आणि त्यामुळे उत्पन्न पाचपट वाढले. एका शेतकऱ्याने जैन उद्योगाला दिलेली ती शाबासकी होती.

पीव्हीसी पाइप व ठिबक सिंचन यांनी कृषिक्षेत्रात कशी क्रांती केली हे ना.धों. महानोर यांनी १९७२च्या दुष्काळातील अनुभवाआधारे सांगितले. परंतु त्यांनी भवरलाल यांना पुढील काळाबाबत इशारा दिला तो महत्त्वाचा आहे. ते म्हणाले, की भवरलाल दोन वर्षांनी पंचाहत्तर वर्षांचे होतील. त्यांनी या दोन वर्षांत उद्योगातील आपले लक्ष कमी करून त्यांचे जे गांधी संशोधन केंद्राचे ध्येयवेड आहे ते पूर्ततेस न्यावे. यापुढे नुसत्या गांधीविचारांचा अभ्यास करून चालणार नाही तर आचरणाचा तसा नमुना ठेवावा लागेल. भाऊनी उर्वरित आयुष्यात ते काम करावे असे महानोर यांनी सुचवले.

भवरलाल यांनी भाषणात सांगितले, की गांधी केंद्रावर वीस कोटी रुपये खर्च होणार आहेत, पण त्यामधून झकास वास्तू उभी राहील. त्याहून अधिक म्हणजे तेथे गांधी-अभ्यासाची सर्व साधने असतील.

जळगाव महानगरपालिकेचा हा पहिला 'जळगावरत्न' पुरस्कार भवरलाल जैन यांना देण्यात औचित्य आहे. कारण त्यांनी शून्यातून उभ्या केलेल्या या उद्योगाने सारे जग पादाक्रांत केले आहे. म्हणूनच, उद्योगाचे उपाध्यक्ष अशोक जैन यांनी एका मुलाखतीत म्हटले आहे ते खरेच वाटते. अशोक जैन म्हणाले, की जैन उद्योगसमुहावर सूर्य कधीच मावळत नाही!

thinkm2010@gmail.com
द्वारा **दिनकर गांगल**
ए/३, अजिंक्यतारा सोसायटी,
स्वस्तिक पार्क, चेंबूर, मुंबई-४०० ०७१

# शरयू ठाकूर यांचे निर्मळ जग

**दिनकर गांगल**

शरयू ठाकूर. निर्मळ मनाच्या, इतक्या पारदर्शक, स्वच्छ, नितळ की लौकिक व्यवहारात भाबड्या वाटाव्या! त्या ४ मार्चला निधन पावल्या. त्यांचे पती गोविंदराव ठाकूर यांचे दोन वर्षांपूर्वी वयाच्या ब्याणव्या वर्षी निधन झाल्यानंतर त्या आजारी-आजारी होत्या. मी त्यांना चाळीस-पंचेचाळीस वर्षे ओळखत होतो. त्या आणि त्यांच्या भगिनी वसुमती धुरू यांच्याकडून जुन्या सूर्यवंशी समाजाच्या, प्रभादेवी-कॅडेल रोडवरील त्यांच्या वस्तीच्या हकिगती ऐकणे ही मोठी मजा असे. वसुमती धुरू यांनी त्यांच्या आईच्या आठवणींचे शब्दांकन केले. ते वीस वर्षांपूर्वी पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले. त्यांनी स्वत:च्या आठवणी लिहिल्या आहेत व त्याही प्रकाशनाच्या टप्प्यावर आहेत. दुर्दैवाने, त्यांचे पती रवींद्र धुरू यांनाही फेब्रुवारीअखेर, वयाच्या चौऱ्याणव्या वर्षी, छोट्या आजारपणानंतर मृत्यू ओढवला. त्यामुळे वसुमतींचे पुस्तकप्रकाशन थोडे पुढे ढकलले गेले आहे.

शरयू ठाकूर या प्रेमळ, ममताळू, प्रसन्न व्यक्तिमत्त्वाच्या होत्या. त्या योगायोगाने राजकारणात पोचल्या, पण त्यांना तोच त्यांचा प्रांत वाटे. त्यांची काँग्रेसनिष्ठा, विशेषत: इंदिरा गांधीनिष्ठा पक्की होती. त्यामुळे त्या काँग्रेससाठी व त्यामधील त्यांना प्रिय वाटणाऱ्या व्यक्तींसाठी काही करायला तयार असत. त्यांच्याकडे साधनसंपत्ती भरपूर होती. त्यांचे सासरे दादोबा ठाकूर हे ओरिएंटल मेटल प्रेसिंग वर्क्सचे संस्थापक-मालक. शरयू ठाकूर यांचे पती गोविंदराव यांनी तो कारखाना बराच काळ बरा चालता ठेवला, परंतु तो त्यांच्या हयातीतच बंद पडला. शरयू ठाकूर कारखान्याच्या संचालक होत्या, परंतु त्यांच्या सार्वजनिक कार्यातील वावराला गोविंदराव पूर्ण पाठिंबा देत.

शरयू ठाकूर दादर-प्रभादेवीमधून आमदार म्हणून दोनदा विधानसभेवर निवडून गेल्या. त्यांनी सिद्धिविनायक मंदिर ट्रस्ट, म्हाडा, कामा रुग्णालय अशा संस्थांची प्रमुखपदे भूषवली. पण त्यांचे खरे प्रेम उजळून येई, ते महिला संघटन कार्यात व गुलाब पुष्परचनेत. त्यांनी इकेबाना या जपानी पुष्परचना कौशल्यात प्रावीण्य मिळवले. त्या तशी प्रदर्शने करत, त्यांनी त्यावर पुस्तकही लिहिले आहे. त्यांना पाकक्रियांमध्ये रस होता व त्या स्वत: जुन्या सूर्यवंशी परंपरेतील उत्तमोत्तम पदार्थ बनवत. ती रसभरीत वर्णने त्यांच्या तोंडूनच ऐकावी.

त्यांनी स्वत:च्या निर्मलतेतून स्वत:चे असे स्वतंत्र, दुष्टावाविरहित, निष्कलंक जग बनवले होते. त्या त्यातच जगत असत. त्यामुळे त्यांचा कुठे भांडणतंटा नसे की त्यांच्याकडे गॉसिप नसे. त्यांना हवे तेवढे लौकिक जगातून उचलून घेत व स्वत:च निर्माण केलेल्या भावजगात राहत व त्यामुळे सतत आनंदी असत. मी त्यांना शेवटच्या आजारपणात देखील दु:खी अशा कधी पाहिल्या नाहीत. वस्तुत: त्यांना 'युरीन'चा त्रास असल्याने त्यांचे हिंडणे-फिरणे बंद झाले होते. त्या दोन वर्षांत त्यांचे आठ-दहा वेळा आठ-आठ, दहा-दहा दिवस रुग्णालयांत राहणे झाले, पण त्या तेथे हसतखेळत राहत. त्यांना भाषा-कविता-नाटके यांची आवड होती. त्यांनी तरुणपणी नाटकेही लिहून ठेवली होती. आजारपणातील स्मरण-



विस्मरणाच्या काळात त्यांना जुन्या कविता, संस्कृत श्लोक आठवत आणि त्या घडाघडा म्हणून दाखवत. त्या तशा अवस्थेतही त्यांची सूक्ष्म नजर फ्लॉवर प्लॉटवर असे. त्यात त्या नियमित नवनवीन फुले आणून ठेवायला लावत. पॉटमधील एकादी काडी हलली-तिरकी झाली तरी दुरुस्त करायला लावत. ते त्यांचे खरे वेड होते.

शरयू ठाकूर यांच्या निधनानिमित्त सूर्यवंशी क्षत्रिय समाजाने १६ मार्चला शोकसभा योजली. वेगवेगळ्या थरांतले बरेच लोक आले होते. वक्त्यांनाही भरभरून बोलायचे होते. प्रकाश मोहाडीकर, भरतकुमार राऊत ही शरयू ठाकूर यांची हक्काची माणसे. ती होतीच, पण राजकारणाच्या बॉर्डरवर वावरणारी निर्मला सामंत-प्रभावळकर, माजी नगरपाल हेगडे अशी मंडळी आवर्जून आली होती. 'आदर्श' प्रकल्पात अधिकारवर्तुळाबाहेर फेकले गेलेले, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांना येण्यास वेळ मिळाला हे पाहून अचंबा वाटला नाही. शरयू व गोविंदराव ठाकूर यांचे चव्हाण कुटुंबीयांशी अशोक यांचे वडील शंकरराव असल्यापासूनचे संबंध. ठाकूर दांपत्य

## 'थिंक महाराष्ट्र'साठी तालुकावार संस्कृतिसेवक प्रतिनिधी हवे आहेत!

सप्रेम नमस्कार, वि.वि.

एका मोठ्या प्रकल्पासाठी तुमचे सहकार्य मिळावे म्हणून हे पत्र लिहीत आहोत. महाराष्ट्रातील संस्कृतिसंचित संकलित करावे या हेतूने व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशनने माहिती संकलनाचा घाट थिंक महाराष्ट्र डॉट कॉम या नावाने घातला आहे. अशी माहिती एकत्र करणाऱ्या व्यक्तीस संस्कृतिसेवक म्हणत आहोत. तालुकानिहाय संस्कृतिसेवक तयार झाल्यास महाराष्ट्राचे समग्र चित्र उभे करणे सोपे होईल. तो वारसा विद्यमान पिढीला अभिमानास्पद वाटेल व पुढील पिढ्यांना उपयुक्त ठरेल. तालुकावार संस्कृतिसेवक तयार झाले तर, वर्षभरात अशा सुमारे साडेतीनशे कार्यकर्त्यांचा एकत्र मेळावा घेऊ शकू.

'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' असे या प्रकल्पाचे शीर्षक असून, या माध्यमातून महाराष्ट्राची गुणवत्ता व चांगुलपणा यांची नोंद करावी अशी कल्पना आहे. हे बरेच मोठे काम आहे. त्यासाठी आपल्यासारख्या सर्व पातळ्यांवरील चिकित्सक व जिज्ञासू माणसांनी एकत्र येणे जरुरीचे वाटते. म्हणून सहकार्याचे हे आवाहन.

या संबंधातातील जबाबदारी अशी :

१. आपण स्वत: किंवा एका व्यक्तीची प्रकल्पासाठी सहकार्य करण्यासाठी नियुक्ती करायची. ती व्यक्ती संस्कृतिसेवक म्हणून ओळखली जाईल.

२. या प्रतिनिधीने आपल्या परिसरातील (तालुका/जिल्हा) वैशिष्ट्यपूर्ण प्रथा, जत्रा, तीर्थस्थाने-मंदिरे, पर्यटनस्थळे, अन्य सामाजिक-सांस्कृतिक माहिती, तसेच व्यक्तिविशेष व संस्था-संघटना विशेष यांबाबतची नोंद व वर्णन लिहून पाठवायचे आहे. ही व अनुषंगिक माहिती संकलित करणे ही संस्कृतिसेवकाची जबाबदारी असणार आहे.

३. ह्या प्रतिनिधीने पुढील दोन वर्षे मुंबईतील संयोजकांशी संबंधात राहून योग्य ती माहिती जमवायची आहे व त्याबाबत लेखन करायचे आहे वा करवून घ्यायचे आहे.

४. माहितीसंकलन व लेखन ही जबाबदारी स्वीकारणाऱ्या संस्कृतिसेवक प्रतिनिधींना त्यांचे योग्य श्रेय नामोल्लेखाने दिले जाईल. या कामी प्रत्यक्ष खर्च झाल्यास त्याचीही परतफेड केली जाईल. हा व्यावहारिक भाग प्रत्यक्ष बोलण्यामधून अधिक स्पष्ट होईल.

५. नियुक्त संस्कृतिसेवक हे उचलणार असलेला खारीचा वाटा एक मोठा सेतू बांधण्यात उपयोगी ठरणार आहे, याचे अवधान सर्व सहभागी व्यक्तींनी ठेवण्याची गरज आहे.

'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' हा ना नफा तत्त्वावर चालवलेला प्रकल्प उभा राहत असून, एका सुदृढ व संपन्न महाराष्ट्राच्या निर्मितीच्या दिशेने टाकलेले ते पहिले पाऊल ठरेल असा विश्वास आहे. राष्ट्र व समाज आपल्यासारख्या सर्वसामान्य व्यक्तींच्या कर्तृत्वातून आणि चांगुलपणातून घडतो अशी 'थिंक महाराष्ट्र...'ची धारणा आहे. त्यामुळे आपले सहकार्य मोलाचे ठरणार आहे.

आपणास स्वत:ला जर या कामात रस वाटला नाही तर, जिज्ञासू व इच्छुक व्यक्तीच्या नजरेस ते आणून द्यावे आणि त्या व्यक्तीला माझ्याशी पत्राने अथवा फोनवर संपर्क साधण्यास सुचवावे, ही विनंती.

पत्रव्यवहारासाठी पत्ता
दिनकर गांगल
ए/३, अजिंक्यतारा सोसायटी, सीएसटी रोड, स्वस्तिक पार्क, चेंबूर,
मुंबई-४०००७१
thinkm2010@gmail.com

त्यांच्या प्रचारार्थ पंधरवडाभर नांदेडला जाऊन राहिल्याची हकिगत सांगत. अशोक एक वर्षांचे असल्यापासून त्यांना खेळवल्याच्या शरयू ठाकूर यांच्या गप्पा व किस्से मनोरंजक असत. अशोक मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी आपल्या एकाद्या समारंभास यावे म्हणून शरयू ठाकूर यांनी जिवाचा आटापिटा केला. त्या अशोक यांना भेटण्यास काही वेळा त्यांच्या बंगल्यावर गेल्या, त्यांनी फोन तर अगणित केले, परंतु शरयू ठाकूर यांना अशोक यांच्याकडून अधिकारपदाच्या काळात दाद मिळाली नाही. शरयू ठाकूर यांचे प्रतिभा पाटील, अशोक चव्हाण, विलासराव देशमुख यांच्या नादी लागणे हा त्यांच्या राजकारणाबाबतच्या वेडेपणाचा भाग वाटे. आम्ही तो त्यांच्या भाबडेपणात टाकून सोडून देत असू.

अशोक चव्हाण यांना शरयू ठाकूर यांच्या शोकसभेला आलेले पाहून नियतीचे विसंगतीचे खेळ मनी येऊन किंचित रूष्ट झालो. या पुरुषाने या बाईला जिवंतपणी हे सुख का लाभू दिले नाही असे म्हणून वाईट वाटले. त्याबरोबरच या घटनेतील काव्यगत न्याय जाणवला. अशा सर्वसामान्य, प्रेमळ कार्यकर्त्यांना दुखावले असता काय शिक्षा होऊ शकते हे त्यांच्यासारख्या तथाकथित राजकारणी नेत्यांना कळेल का?

सभेतून परतताना, मी माझ्याच मनाला समजावत होतो, की माझ्या मनात अशोक चव्हाण यांच्या उपस्थितीने जे बरेवाईट प्रतिसाद उमटले तसे शरयू ठाकूर यांना काही वाटले नसते. त्या भौतिक व लौकिक जगात वावर ठेवून मनाने सतत भल्या अशा अलौकिक जगात जगल्या. आता तर, त्यांचा देहदेखील लौकिकात नाही. त्यांच्या दीर्घ सहवासाने मलाही त्यांच्या अलौकिक भावजीवनाची झलक अनुभवण्यास मिळाली. त्यामुळे त्यांच्या या जगात नसण्याची उणीव मला सतत जाणवत राहील.

**– दिनकर गांगल**
dinkarhgangal@yahoo.co.in

# गुजराथची घोडदौड, कोणाकोणाला तुडवून?

**राम पुनियानी**

अनुवाद -**विजया चौहान**

गुजराथचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांचे गेल्या नऊ वर्षांच्या राजवटीतील एक महत्त्वाचे यश म्हणजे त्यांनी गुजराथची (की स्वत:ची) उंचावलेली प्रतिमा. १९६१च्या विभाजनानंतर गुजराथ हे स्वतंत्र राज्य झाले. मुळात ते शेती व उद्योग या दोन्ही क्षेत्रांत पारंपरिक एक दृष्ट्या प्रगत राज्य. कच्छ सोडता सुजलाम्-सुफलाम् - आता ही भर. मोदींमुळे झालेला 'व्हायब्रंट गुजराथ' - सळसळता-उसळता-चमकता गुजराथ.

सत्याचा आभास निर्माण करणे - विशेषत: माध्यमांच्या साहाय्याने प्रभावशाली जाहिरातींद्वारा - आता अवघड नाही. २००२च्या गोध्राकांडानंतरच्या शासन (की मोदी?) प्रणित दंग्यांमध्ये २००० पेक्षा अधिक मुस्लिमांच्या कत्तली, बलात्कार, अपमान आणि गेल्या नऊ वर्षांतील आपद्ग्रस्तांच्या पुनर्वसनाविषयी राज्य शासनाने (मोदींच्या आज्ञेनुसार?) दाखवलेली संपूर्ण उदासीनता. निर्वासित छावण्या अल्पावधीत बंद करण्याची दाखवलेली तत्परता आणि आजही अल्पसंख्यांकाना वाटत असलेली भीती, दडपण हादेखील मोदी शासनाचाच एक इतरांसाठी दडवलेला चेहरा.

अब्दुल सालेह शरीफ यांनी केलेला एक अभ्यास नुकताच प्रसिद्ध झाला आहे. (Relative Development of Gujarat and Socio-Religious Differntials, 2011) गुजराथमधील मुस्लिमांच्या सद्य:स्थितीवर हा अहवाल प्रकाश टाकतो. दारिद्र्य, भूक, शिक्षण, सामाजिक सद्य:स्थितीवर हा अहवाल प्रकाश टाकतो. दारिद्र्य, भूक, शिक्षण, सामाजिक सुरक्षा - कोणताही बिंदू विचारात घेतला तरी मुस्लिमांची परिस्थिती भयानक आहे. 'भूक'-बिहार आणि ओरिसाशीच तुलना होऊ शकेल अशी परिस्थिती आज गुजरातमध्ये आहे. अनेक शाळा-महाविद्यालयांमध्ये आजही मुस्लिमांना प्रवेश मिळत नाही. ज्या कापड आणि हिरे व्यापारात मुस्लिमांचे प्राबल्य होते तिथून त्यांची पीछेहाट झाली आहे. गुजराथमधील मुस्लिमांचे दारिद्र्य उच्चवर्णीय हिंदूंच्या तुलनेत आठ पट जास्त तर ओबीसींच्या तुलनेत पन्नास टक्के जास्त आहे असे हा अभ्यास दर्शवतो. गुजराथमधील एकूण मुस्लिमांपैकी फक्त बारा टक्के मुस्लिमांची बँकेत खाती आहेत आणि त्यापैकी २.७ टक्के लोकांची कर्जे मंजूर झाली आहेत. अगदी १८ फेब्रुवारी २०११च्या टाइम्स ऑफ इंडिया-मुंबई आवृत्तीनुसार गुजराथमध्ये रोजगार हमी योजनेतही (म. गांधी-नरेगा-NREGA) मुस्लिमांना काम देण्याबाबत टाळाटाळ केली जाते-भेदभाव केला जातो.

वस्तुस्थिती हेच दर्शवते, की काही श्रीमंत व्यापारी मुस्लिम अल्पसंख्याकांचा अपवाद वगळता, आजही गुजराथमधील मुस्लिम भेदरलेले-दबलेलेच आहेत. 'प्रथम' ही आज एक भारतभर मान्यता असलेली, शैक्षणिक अभ्यास करणारी संस्था. डॉ. माधव चव्हाण हे 'प्रथम'चे सी.ई.ओ. 'प्रथम'तर्फे दरवर्षी राज्यनिहाय शैक्षणिक स्थितीची सांख्यिकीय माहिती देणारे अहवाल प्रसिद्ध होतात. गुजराथची शैक्षणिक प्रकृती-प्रथमच्या असर (Annaul Status of Education Report) अहवालानुसार बिहारपेक्षा खालावलेली आहे. गुजराथमधील सामाजिक विकासाचे आकडे (प्रसुतीदरम्यान) माता मृत्यू , ५ वर्षाखालील मुलांचे मृत्यू, पिण्याचे पाणी, आरोग्याच्या सोयी, अन्नसुरक्षा, कुपोषण, मुलींचे शिक्षण इत्यादी) आणि अर्थसंकल्पातील या गोष्टींसाठीच्या तरतुदी याचा विचार केला तर भारतातील १८ मोठ्या राज्यांमध्ये गुजराथचा क्रमांक १७ वा आहे आणि या वास्तवापलिकडील वास्तव आहे सामाजिक-धर्मनिहाय भेदाभेदांचे. गुजराथमधील भावनिक-मानसिक फाळणी, विशिष्ट वस्त्यांमध्ये ढकलले गेल्यामुळे सामाजिक दृष्ट्या बंदिवान झालेले मुस्लिम अल्पसंख्याक, त्यांच्या वस्त्यांमधील पाणी, रस्ते, शौचालये या भौतिक सुविधांचा अभावच नव्हे तर बँक, फोन, शाळा अशा आर्थिक-सामाजिक संस्थांचे अघोषित बहिष्कार.. का पोचत नाही हा 'विकास' सर्वांपर्यंत?

अगदी 'गरवी गुजराथ' परदेशस्थ गुजराथी लोकांचे वार्षिक मेळावे, देशा-परदेशातील उद्योगपतींच्या डोळे दिपवणाऱ्या परिषदा या सर्वांतून मोदी असे भासवत आहेत की गुजराथमध्ये डॉलरच्या नद्या वाहताहेत-पौंड-युरो-रुपयांचे धबधबे कोसळताहेत-प्रगती विकासाचे वारू जणू

गेल्या नऊ वर्षांतच सुसाट पळत सुटले आहे. मात्र माहितीच्या अधिकाराचा उपयोग करून समोर आणावे लागलेले आकडे काही वेगळेच बोलतात – २००५च्या ‘व्हायब्रंट गुजराथ’नंतर सांगितले गेले की १०६१६१ कोटी रुपये गुजराथमध्ये आले. पैकी मोदींच्या म्हणण्याप्रमाणे ६३% (७४०१९ कोटी रु.) प्रत्यक्ष गुंतवणूक झाली. माहिती अधिकारातर्फे मिळवलेले उत्तर आहे २३.५२% (२४९९८ कोटी रु.) गुंतवणुकीचे. तसेच तिस्ता सेटलवाड यांच्या अभ्यासानुसार, २००७ मध्ये ३६३ करारांवर म्हणे सह्या झाल्या. मोदींचा आकडा ४६१८३५ कोटी रुपयांचा. प्रत्यक्षातील रक्कम ४५१८३५ कोटी रु. (१०००० कोटी रु. कमी). गुजराथ सरकारचा दावा असा, की या ४५२८३५ कोटी रुपयांपैकी २६४५७५ कोटी रुपये गुंतवले – पण गुजराथचा ‘औद्योगिक आयोग’ सांगतो तो आकडा आहे १२२४००.६६ कोटी रुपयांचा. २००३, २००५ आणि २००७ मधील आकड्यांनुसार प्रत्यक्षात फक्त २०.२८ टक्के प्रकल्प मार्गी लागले आहेत.

आधी म्हटल्याप्रमाणे गुजराथ हे सुरुवातीपासूनच औद्योगिक दृष्टचा आघाडीवर असलेले राज्य. (तरी क्रमांक महाराष्ट्राच्या नंतर आहे – जरी महाराष्ट्रात दुर्दैवाने एकापेक्षा एक कर्तृत्वहीन मुख्यमंत्री गेल्या १५ वर्षांत गादीवर बसले) अर्थात माध्यमांना गुजराथच्या प्रगतीचे ढोल बडवायला आवडते (का कोण जाणे!) ही वस्तुस्थिती आहे. दोन दशकांपूर्वी राष्ट्रीय दरवाढ जेव्हा ६ ते ७ टक्के होती तेव्हा गुजराथ राज्याची दरवाढ १२–१३ टक्के होती. आज गुजराथचा दर ११ टक्के तर राष्ट्रीय दर ८ ते ९ टक्के, हा फरक इतका कमी का झाला? ज्याचे त्याने शोधावे उत्तर.

सरदार सरोवराची उंची १२२ मीटरपर्यंत वाढवण्यात गुजराथने मजल मारली – मात्र वीजनिर्मिती अपेक्षेच्या १० टक्के, पाण्याचा शेतीसाठी उपयोग २० ते २५ टक्के – अपेक्षेच्या तुलनेत – आणि कच्छ कोरडाच–कच्छचे शेतकरी सुप्रीम कोर्टात. आतापर्यंत बांधलेले कालवे सतत फुटताहेत – शेतकरी आता कालव्यांसाठी जमिनी द्यायला तयार नाहीत. गुजराथ सरकारने टाटांच्या नॅनोला कृषी विद्यापीठाची जमीन आंदण दिली. उद्योगपतींना जमीन–पाणी–वीज मोदी एकहाती दान करताहेत किंवा नगण्य दराने अनेक वर्षांच्या लीजने देत आहेत. उद्योगपतींना मोकळे रान, पण नोकऱ्या किती निर्माण झाल्या मोदीच जाणोत. मात्र आकडेवारी सांगते की गुंतवणुकीच्या प्रमाणात रोजगारनिर्मितीत महाराष्ट्र व तामीळनाडू राज्ये आघाडीवर आहेत. ‘पर्यावरण’ शब्दाशी तर गुजराथने फारकतच घेतली आहे. (नुकतीच कच्छमध्ये NDTV च्या पत्रकारांवर अदाणी ग्रुपच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या हल्ल्याची दृश्ये आपण पाहिली असतील. गुजराथचे सळसळते यश ज्यांना एवढे भावते त्यांना ह्या गोष्टी माहीत आहेत का की गुजराथमध्ये भ्रूणहत्येचे (स्त्री गर्भ) प्रमाण वाढते आहे, स्त्री–पुरुष प्रमाणात कमालीची तफावत आहे, भुकेच्या संदर्भात ज्या राज्यांची तुलना फक्त जगातील ‘इथियोपिया’ या एकाच देशाशी केली जाते अशा झारखंड, बिहार, मध्यप्रदेश या राज्यांच्या वर गुजराथचा नंबर आहे एवढेच समाधान. २००३–०४ मधील कृषी उत्पादन ६५.७१ लाख टन तर २००४–०५ मधील ५१.५३ लाख टन. २००५च्या एनएसएसच्या अहवालानुसार जवळजवळ ४० टक्के शेतकऱ्यांना शेती व्यवसाय सोडायचा आहे. हे सारे आहे वास्तव ‘शायनिंग इंडिया’प्रमाणे नगारे वाजवणाऱ्या ‘व्हायब्रंट गुजराथ’चे.

माध्यमांनी (प्रिंट व इलेक्ट्रॉनिक) जणू विडाच उचलला आहे, की मानवी कत्तलींना उत्तेजन देऊन धार्मिक दुफळींचीही उंच भिंत गुजराथमध्ये बांधणाऱ्या मोदींना आता ‘विकास पुरुष’ मोदी बनवायचे. गुजराथमधील पूर्वीपासूनच चांगले असलेले रस्ते अधिक गुळगुळीत करून, मॉल्स उभारून मध्यम–उच्च मध्यम व श्रीमंत वर्गाला खूश ठेवणे आणि विकासाच्या या आरशांमध्येच ज्यांना प्रगतीचा चेहरा दिसतो त्यांच्यापासून बाकी भोके–ठिगळे लपवायची. मोदी स्वप्रचारात नं. १ आहेत यात शंकाच नाही. २००७ साली विधानसभेतील एका प्रश्नाला उत्तर देताना मोदीच म्हणाले होते की त्यावर्षी गुजराथमध्ये १४८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आणि परिस्थिती खालावतच आहे. एका बाजूला राज्यातील वीज गुजराथ अन्य राज्यांना विकते तर गुजराथमधील कितीतरी खेडी वीजवंचित आहेत. इंडियन एक्स्प्रेस – ८ एप्रिल २००८ रोजीच्या वृत्तानुसार ९०० मेगावॅट विजेची तूट गुजराथ राज्यात आहे. १९९९ साली गुजराथमध्ये ४६.३ टक्के स्त्रिया ॲनिमियाग्रस्त होत्या. २००४ साली ही संख्या ५५.५ टक्के झाली. (आकडेवारी २००६ सालच्या नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हेवरून) मुलांमधील कुपोषण वाढते आहे. स्त्रिया–दलित यांची उपेक्षा कमालीची वाढली आहे.

पण हा गुजराथ कळायचा तर डोळे व बुद्धी उघडी हवी. झकपकीने भारून जाणाऱ्या – अहमदाबाद–गांधीनगर हा २२ किलोमीटर प्रवास गुळगुळीत रस्त्यांवरून करणाऱ्यांना पंचमहाल, छोटा उदेपूर, कच्छ अशा साऱ्यांच भागात जाणे आवश्यक आहे.


**मूळ लेख – राम पुनियानी**
rpuniyani.2002@gmail.com
स्वैर अनुवाद
(काही मुद्यांची भर घालून)
**विजया चौहान**
vijaya.chauhan@gmail.com

# घर एक स्टुडिओ

## सुधीर पटवर्धन


या प्रदर्शनात प्रदर्शित झालेली चित्रे म्हणजे माझ्या कलाप्रवासातील एक वेगळे वळण आहे. सामान्य माणसाचे जीवन हा केंद्रबिंदू तोच असला तरी या जीवनकथांचा मूलस्त्रोत बदललेला आहे. महानगरी वास्तव आणि समाजव्यवस्था यांच्या नात्याचा माझा जो शोध चालू आहे. त्याच्याशी हे चित्रविषय सुसंगतच होते. अलीकडच्या काळात आदर्श समाज या कल्पनेला निर्माण झालेला धोका हादेखील माझ्या चिंतेचा विषय होता. आत्ताचे प्रदर्शित होणारे काम म्हणजे एक प्रकारे या बहिर्मुख समाजचिंतनापासून अलिप्त होण्याची एक प्रक्रिया आहे. गेल्या दोन वर्षांपासून माझ्या चित्रांमध्ये कुटुंब कल्पनेला अधिक वाव मिळत गेला आहे. या प्रदर्शनातील चित्रांमध्ये घरगुती वातावरण आणि कौटुंबिक व्यक्तिरेखा आलेल्या आहेत. एका अर्थाने त्या कुटुंबकथा आहेत. माझ्या चित्रनिर्मितीसंबंधी मी स्वत:ला नेहमीच काही प्रश्न विचारत असतो; चित्र-विषयाला न्याय देण्याबाबतचे प्रश्न आणि माझे समाजाशी असलेले नाते किती सच्चेपणाने त्यातून व्यक्त होते याबद्दलचे प्रश्न. आजही प्रश्न तेच आहेत. पण ते प्रश्न सामाजिक संदर्भात विचारण्यापेक्षा कौटुंबिक अनुभवाच्या चौकटीत उपस्थित केले की त्यांना एक वेगळा भावार्थ प्राप्त होतो.

माझ्या कामात झालेला हा अचानक बदल आम्हाला नातू झाला त्यामुळे झाला असावा! तुम्ही आजोबा झालात की वडील आणि मुलगा या नात्याने घेतलेल्या स्वत:च्या व्यामिश्र अनुभवांना वेगळ्या अंगाने पाहू लागता. आत्ताच्या चित्रांमागे ही बदललेली दृष्टी आहे. मुलगा, वडील आणि आजोबा अशा नात्यांमध्ये स्वत:ला पाहणे, या चित्रांमधून त्यांच्यातला ताण्याबाण्यांना मुक्त वाव देणे हे खरे तर एक आव्हान होते. पिता-पुत्र किंवा स्थूलमानाने बोलायचे तर वडीलधारे-मुले-नातवंडे अशा नात्यांव्यतिरिक्त या कौटुंबिक अवकाशात आणखी एक कुटुंबकथा आकारास येते. ती म्हणजे अर्थातच पती-पत्नी, स्त्री-पुरुष नात्याची कथा. पती-पत्नीचे नातेसुद्धा अनेक चित्रांमध्ये आलेले आहे. काही रेखाचित्रांत तर त्यावरच भर आहे. घराचे अवकाश चार भिंतींबरोबरच खिडकीतून दिसणाऱ्या बाह्य जगानेदेखील बनलेले असते. या कुटुंबकथा अशा बंदिस्त अवकाशातच उलगडतात. ही चित्रे मुख्यत: चिरपरिचित प्रसंगांची, विचार आणि भावनांची दृश्यरुपे आहेत. कधी ती पृष्ठभागाखाली दडलेल्या आणि त्या दडलेल्याच राहाव्यात अशी सुप्त इच्छा असलेल्या आपल्या जाणिवांचा शोध घेतात. पण बऱ्याच वेळा दैनंदिन अनुभवच त्यातून व्यक्त होतो. पारंपारिक कौटुंबिक आदर्शांबद्दल संदेह निर्माण करण्याचा अथवा या आदर्शांना मुरड घालण्याचा इथे मुळीच उद्देश नाही. फक्त माहीत असलेल्या गोष्टीच पुन्हा एकदा जाणून घेण्याचा इथे प्रयत्न आहे.



**फॅमिली फिक्शन, २०१०, कॅनव्हासवर ॲक्रिलिक**

'फॅमिली' या



**ग्रे चेंबर, २०१०, कॅनव्हासवर ॲक्रिलिक**

चित्रामध्ये आशा-निराशा आणि आनंदाचे आडवे-उभे प्रवाह मानवी आकृतींना बांधून ठेवतात. जबाबदाऱ्या हस्तांतरित केल्यावर प्रौढ जोडपे केंद्रबिंदूपासून ढळते आणि अडगळीत पडल्याच्या अनुभवाला सामोरे जाते, तर तरुण जोडपे नव्या केंद्रबिंदूभोवती त्यांचे विश्व गुंफू लागते. ही अपरिहार्य अशी नेहमीची रीत आहे. त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या प्रेम आणि सहनशीलता यांच्या जोरावर अनेक कुटुंबे आपआपल्या पद्धतीने सोडवत असतात. 'फॅमिली' हे चित्र एका अर्थाने या चित्रमालिकेचा आरंभबिंदू होता. 'फॅमिली फिक्शन' या चित्रात हे बंदिस्त कौटुंबिक अवकाश मुक्त होते, किंबहुना त्याचा स्फोट होतो. चित्रकला आणि सिनेमाच्या भिन्न जगांमधल्या अनेक प्रतिमा गर्दी करतात आणि घराचा उंबरा ओलांडून आत शिरतात. फँटसीज्‌ना उजाळा मिळतो. काळाची चौकट गळून पडते. पिता-पुत्राची संयुक्त व्यक्तिमत्त्वे या सरमिसळीतून आकाराला येतात. पार्श्वभूमीचे तपशील कलेच्या माध्यमातून गतायुष्याचा पुन:प्रत्यय घेण्यास अनुकूल असे वातावरण तयार करतात.

बऱ्याच जोडप्यांच्या बाबतीत आपल्या जोडीदारासोबत मध्यम वय ओलांडून वार्धक्यात होणारा प्रवेश म्हणजे दु:खदायक आणि हलक्याफुलक्या घटनांनी भरलेला एक 'ट्रॅजि-कॉमिक' प्रवास असतो. ब्रशने केलेली रेखाटने या प्रवासातले चढउतार टिपतात. दैनंदिन, घरगुती स्वरूपाच्या आव्हानांबरोबरच पती-पत्नीचे नाते लैंगिक प्रेरणांच्या अग्निपरीक्षेतून तावून-सुलाखून निघते. तिथे स्त्री-पुरुष नात्यातील अपेक्षा आणि अपेक्षाभंगांना मुक्त व्यासपीठ मिळते. त्यातून कधी हिंसा पोसली जाते तर कधी एकमेकांबद्दल प्रगाढ समजूतदारपणा निर्माण होतो.

आजारपण आणि मृत्यू प्रत्येक कुटुंबकथेचा अविभाज्य भाग आहे. प्रदर्शनातील काही रेखाटनांमधूल आजारी माणसाची शय्या म्हणजे संभाव्य अटळतेची प्रतीक्षा करण्याचे ठिकाण बनते. 'फुल सर्कल' या चित्रामध्ये कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती घरातले आजारपण मृत्यूच्या घटनेने किंवा परिस्थिती पूर्वपदावर आल्याने, पण कधी एकदाचे संपेल याची वाट पाहते आहे. प्रतीक्षेमुळे सहनशक्तीचा अंत होतो, मुखवटे गळून पडतात आणि कुटुंबीयांच्या खऱ्या इच्छा बाहेर येऊ लागतात. कुटुंबातील व्यक्तीचा मृत्यू धक्कादायक तरी असतो किंवा सुटकेची भावना तरी निर्माण करतो. बऱ्याच वेळा अशा प्रसंगी आपली द्विधा मन:स्थिती होते. मृत्यूची अटळताच आपल्याला या द्विधा मन:स्थितीतून सोडवते. पण खरा गोंधळ उडतो तो भयमिश्रित इच्छांनी युक्त अशा हयात व्यक्तींच्या खऱ्याखोट्या काल्पनिक मृत्यूच्या भासस्वप्नांमुळे. ही द्विधा मन:स्थितीच मनाला अंधाऱ्या गुहेत घेऊन जाते, जिथे मृत्यूची प्रत्येक घटना ही हत्याच असते.

'हत्या आणि मरण' ही सर्व प्रकारच्या कलेमधून पुन्हा पुन्हा येणारी प्रतिमा आहे. या प्रतिमेची ओढ खोलवर

रुजलेली आहे. मीसुद्धा मुडद्यांच्या ढिगाऱ्यांच्या प्रतिमेकडे ओढला जातो. विसाव्या शतकाने अशा असंख्य प्रतिमा पुरवलेल्या आहेत. संताप, अपराधाची बोच आणि झपाटलेपण या प्रतिमांच्या शोधप्रवासात इतके बेमालूमपणे मिसळले आहे की माणसाला त्याची इतकी ओढ का असा प्रश्न पडावा! दुसऱ्या बाजूला गुस्ताव क्लिम्टच्या चित्रातील नग्न स्त्रीदेहांच्या उत्तेजक समूहाने मी झपाटला जातो आणि त्यातून 'ग्रे चेम्बर' या चित्रातील सीलिंगवरील चित्रप्रतिमा साकार होते. त्या प्रतिमेखाली टेबलावर मुडद्यांची रास पडलेली आहे. लैंगिक वासनांवर पोसलेली हिंसक वृत्तीची दबा धरून बसलेली जाणीव हीच माझ्या मनात या दोन प्रतिमा एकत्र आणण्यास कारणीभूत झाली असावी. ह्या चित्राची सुरुवात करण्यासाठी मला अनेक महिने लागले. त्याची दृश्यप्रतिमा माझ्या मनात पक्की होती पण त्याच्या प्रयोजनाबद्दल मी साशंक होतो. त्यात आत्मक्लेशाची भावना होती की क्षमाशीलता होती? माझा निर्णय होत नव्हता. चित्राच्या निर्मितिप्रक्रियेतूनच आशयार्थ आपोआप उलगडेल या विश्वासाने शेवटी त्या सलत राहणाऱ्या प्रतिमेवरच मी सारा भरवसा टाकून दिला.

'व्हिजिटेशन' या चित्रात एक वेगळ्या प्रकारचे एकत्रीकरण आहे. धक्कादायक अनुभवांच्या कोड्यात टाकणाऱ्या स्मृती आणि खिडकीतून दिसणाऱ्या विशिष्ट देखाव्याचे आकर्षण यातून एक स्वप्न तयार होते. प्रकृतीतले चढउतार, असमर्थता आणि जाणिवांचे उन्नयन असे संमिश्र धागे कथनसूत्रात विणलेले आहेत. बाहेरचे जग आणि आतले जग यांचा समतोल या चित्रात साधलेला आहे. पण बाह्य अवकाश आणि अंतरंग यांच्यातील गुंतागुंत आणि अंतर्विरोध या चित्रात स्पष्टपणे येतात असे मला वाटते.

या प्रदर्शनात खिडकी ही एक प्रतिमा म्हणून महत्त्वाची भूमिका बजावणारी अनेक चित्रे आहेत. खिडकी घरातले बंदिस्त अवकाश बाह्य जगाच्या, विशेषत: शहराच्या दिशेने खुले करते. खिडकीच्या संदर्भचौकटीतून शहराचा दिसणारा भाग आकर्षक भासतो. खोलीच्या अवकाशातून शहराच्या विशिष्ट भागच दिसत असल्यामुळे तसे वाटत असेल. 'विंडो' शीर्षकाच्या लहान आकाराच्या चित्रांमधून एका अवकाशातून दुसऱ्या अवकाशात पाहणे, सुरक्षितता आणि बाह्य जगाचे आकलन अशा जाणिवांचा शोध घेतलेला आहे. पण घराचे अवकाश नेहमीच सुरक्षित असते असे नाही. बाह्य जगाचे आकर्षण हा आतल्या बंदिस्त घुसमटीतून बाहेरचा मोकळा श्वास घेण्याचा प्रयत्नही असू शकतो. कारणे काही असोत, अंतर्गत आणि बाह्य अवकाशांमधला खिडकी हा एक दुवा आहे. दोन्हींमधील अंतर कायम राखणारा. मला अभिप्रेत असलेली दोन्ही अवकाशांची निकड त्यातून व्यक्त होते.

ऐंशीच्या दशकात बाह्य जगाचे लँडस्केप म्हणजेच शहराचे चित्र जणू काही माझ्यासाठी प्रकाशाने उजळलेल्या अंतरंगाचे प्रतिबिंब होते. 'नॉस्टॅल्जिया' हे चित्र त्या काळासंबंधी आहे. एका काल्पनिक सुसंवादाचे स्मरणरंजन म्हणजे नॉस्टॅल्जिया. मी त्याला काल्पनिक म्हणतो. कारण हा सुसंवाद म्हणजे एक अर्धसत्य होते. ज्या शहराच्या आणि घराच्या अवकाशात ही काल्पनिकता कार्यरत होती ती मतभेदाची आणि संघर्षाची ठिकाणेही होती. सुसंवादाची ती फक्त आशास्थाने होती. साहजिकच हे चित्र त्या आशास्थानांचेही स्मरणरंजन ठरते.

एकच मानवाकृती असलेली काही चित्रे या प्रदर्शनात आहेत. उदा. 'मायग्रंट', 'बॅक', 'जॉगर' वगैरे. माझ्या आधीच्या चित्रांशी त्यांचे जवळचे नाते आहे. मानवाकृती हा माझा प्रमुख शोध राहिला आहे आणि अशा अभ्यास-विषयांशी असलेला माझा बंध या चित्रांद्वारे दृढ होतो. आजपर्यंत असंख्य वेळा आणि अनेक पद्धतींनी मानवाकृती रेखाटल्या गेल्या, पण दरवेळेस ती नव्याने चित्रबद्ध व्हायला आतुर असते. माझ्या मते विश्वासार्ह आणि अभिनव अशा नव्या अवतारांमधून मानवाच्या सत्त्वाचा हा शोध चालूच राहील.

वर्षानुवर्षे रस्त्यावरील जीवनाचा घटक बनून दृष्टिपथात येणाऱ्या रस्त्याचे चित्रण केल्यानंतर मी जेव्हा माझ्या घराच्या अवकाशात परतण्यामागचे कारण शोधतो किंवा या घटनेचा अर्थ लावतो तेव्हा काही प्रश्न पडतात. माझ्यापुरते रस्त्यावरील जीवनाचे आकर्षण आणि त्याच्यातली गुंतवणूक संपली आहे का? की ते वातावरण आता असह्य झाले आहे? किंवा घरी परतण्याचे नवे वळण आता मला अधिक महत्त्वाचे आणि आव्हानात्मक वाटते आहे का? अथवा ते सत्याच्या अधिक जवळ जाणारे आहे? काळानुसार माझे काम एखाद्या लंबकाप्रमाणे दोन ध्रुवांमध्ये आंदोलत राहिले आहे. अलिप्त वस्तुनिष्ठतेपासून ते टोकाच्या व्यक्तिनिष्ठे-पर्यंत आणि भावनिक जवळीकीपासून पुन्हा दूरस्थ भावनेपर्यंत! घराच्या भिंतीच्या आत परतण्याची सध्याची ही अवस्था तात्पुरती असेल आणि ती जाईलही. पण तसे घडण्यापूर्वी सध्या असलेल्या अवस्थेचा मन:पूर्वक शोध घेतला पाहिजे आणि सध्याच्या गरजांना त्यांचे मोल दिले पाहिजे.

इंग्रजी अनुवादावरून
**मराठी अनुवाद : दीपक घारे**
('फॅमिली फिक्शन' या डॉ. सुधीर पटवर्धन यांच्या प्रदर्शनावरील साक्षी गॅलरी प्रकाशित कॅटलॉगमधून साभार)

# 'जनसंवाद'शी जोडले राहा

## सु.गो. तपस्वी

गेली दोन वर्षं ग्रंथालीच्या विश्वस्तांनी रुची ह्या ग्रंथालीच्या मुखपत्रात 'जनसंवाद' हे सदर चालवलं; त्या सहकार्याबद्दल 'जनसंवाद'चा समन्वयक ह्या नात्यानं 'जनसंवाद'तर्फे आणि लेखक म्हणून माझ्यातर्फे ग्रंथालीच्या विश्वस्तांचे आभार मानतो. या लेखानं दोन वर्षं चाललेल्या लेखमालेची सांगता होत आहे.

**पार्श्वभूमी**

'जनसंवाद' हा एक वैचारिक गट आहे. ह्या गटाचं प्रयोजन एकच, देशातील सत्शक्तींचं संघटन. राजकारणात अनेक पक्ष असतात; त्यांची सर्वांची उद्दिष्टं जरी साधारणत: जनतेच्या भल्याचीच असली तरी विचारसरणी निरनिराळी असते. राजकारणी आपल्यातील विविधतेला जपतात. तरीही त्यांना भोवतालाचं, व्यवहाराचं भान असतं; योग्य त्या क्षणी युती साधून ते वेळ निभावतात. काँग्रेस व बीजेपी ह्या दोन प्रमुख देशव्यापी पक्षांनी आपापसांत कधीही युती केली नाही, परंतु बहुतेक राजकीय पक्षांनी कुठे नि कुठे आणि कधी ना कधी युती साधली होती व आहे. समाजकारण्यांचं तसं होत नाही. सत्शक्तीतत्त्वांना चिकटण्याच्या आग्रहास्तव इतर विचारसरणी असलेल्या व्यक्तींना वर्ज्य मानते; कोणत्याही प्रकारची तडजोड आम्हाला मान्य नसते!

कोणत्याही धर्मपंथात आणि प्रत्येक राजकीय पक्षात सत्शक्तींचं वास्तव्य असतंच. परंतु, उपरोक्त कारणामुळे देशातील सत्शक्ती विभागली गेली आहे, आणि म्हणूनच ती कमजोर भासते.

विभाजनामुळे सत्शक्तीचा राजकारणावर प्रभाव पडत नाही. सत्शक्ती एकत्र येण्याकरता, ती संघटित होण्याकरता अशी एखादी चळवळ गरजेची आहे की ज्या चळवळीमुळे, तिच्या दृश्य स्वरूपातील लक्ष्यामुळे, विविध पक्ष, धर्म व विचारसरणींच्या सत्शक्तींचा आपापसांत संवाद सुरू होईल. हीच 'जनसंवाद' ह्या गटामागील प्रेरणा आहे.

'जनसंवाद'नं निवडलेली ती चळवळ आहे समाजाच्या, आमच्याच वृत्तीबदलाची. 'जनसंवाद'ची सल्लागार समिती दर महिन्याला भेटते व महाराष्ट्रासाठी गटाची सर्वसाधारण त्रैमासिक बैठक पुण्यात घेतली जाते. धर्म, राजकीय विचारसरणी, लिंग, वंश, शिक्षण, व्यवसाय, इत्यादी गोष्टींना 'जनसंवाद'च्या विचारसरणीत स्थान नाही; ध्यास आहे तो फक्त निकोप समाजनिर्मितीचा.

जनजागृतीसाठी समाजात लोकशाही आणि नागरिकत्व ह्या भावनांची जोपासना जशी गरजेची आहे, तद्वत, लोप पावत असलेली सामाजिक बांधिलकीसुद्धा पुनर्जीवित केली पाहिजे. 'जनसंवाद' हा गट कायम अशा मुद्यांवर चर्चा व संदर्भातील समर्पक उपाययोजनांच्या शोधात असतो. काय व्हायला हवं ह्या गोष्टीचं आकलन झालं असलं तरी ते कसं साधता येईल हा महत्त्वाचा प्रश्न आहे; समाजात गरजेचा व्यक्तीबदल साधणं अशक्य नसलं तरी महकठीण आहे, हे सुद्धा 'जनसंवाद' जाणून आहे.

**'जनसंवाद'ची उद्दिष्टं**

'जनसंवाद' हा एक वैचारिक गट आहे; धर्मनिरपेक्ष आणि पक्षनिरपेक्ष राहून समाजातील शक्तिसामर्थ्य संघटित करणारा, सुसंस्कृत व सक्षम समाजाचं स्वप्न बाळगणारा, संवेदनशील व सत्प्रवृत्त समाजमनाला हाक देणारा आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे संविधानातील लोकशाही मूल्यं केंद्रस्थानी मानणारा. साठ वर्षांपूर्वी भारतानं लोकशाही राजवट जवळ केली, परंतु आजही दृष्टोत्पत्तीस येतं ते म्हणजे समाजाची मानसिकता सरंजामशाही-चीच आहे. आपल्या अनेक सामाजिक व राजकीय समस्यांचं मूळ ह्या विरोधाभासातच आहे. अशाच विचारांतून ३ मे, २००९ रोजी 'जनसंवाद' हा वैचारिक गट उदयास आला.

**● नजिकची उद्दिष्टं**

'जनसंवाद'च्या नजिकच्या उद्दिष्टांत प्रचार व प्रसारावर भर दिला आहे. त्यानुसार, जनजागृती उपक्रमाद्वारे दर वर्षी एखाद्या सामाजिक विषयावर राज्यात अनेक ठिकाणी प्रकाशित होणाऱ्या दिवाळी विशेषांकांद्वारे स्पर्धा घेण्यात येते. २००९ च्या दिवाळीत विषय होता **'सामाजिक मूल्ये'** आणि २०१० चा विषय होता **'सामाजिक बांधिलकी'**. गेल्या दिवाळीत सहभागी झालेल्या स्थानिक प्रकाशनांनी त्यांच्याकडे आलेल्या प्रतिसादातून तीसेक स्पर्धकांचं लिखाण राज्यस्तरावरील अंतिम फेरीसाठी पात्र ठरवलं. राज्यातील ठिकठिकाणच्या आठ परीक्षकांनी केलेल्या मूल्यांकनानुसार प्रस्तुत राज्यव्यापी स्पर्धेचा निकाल नुकताच घोषित करण्यात आला आहे.

दुसरा उपक्रम आहे तो गावोगावी चर्चागट स्थापन करण्याचा. ह्या गटांना **'जनसंवाद-मंच'** असं संबोधलं जाईल. साधारणत:, जवळपास राहणारे वा सहजी भेटू शकणारे दहा-पंधरा लोक विविध उद्दिष्टांनी एकत्र येऊन आपापले गट स्थापन करतील. मात्र, इतर विषयांबरोबर, आळीपाळीनं दर महिन्यात पुढील तीन विषयांपैकी एखाद्या विषयावर गप्पा मारतील, गटचर्चा साधतील. ते तीन विषय आहेत – लोकशाही व नागरिकत्वाची मूल्यं,

सामाजिक बांधिलकी आणि ग्रामीण व नागरी समस्या निवारणार्थ 'घटना' मान्य कार्यक्रमांची रूपरेषा. 'मंचा'तील चर्चा अनौपचारिक असतील. हळुहळू त्या चर्चांमधून लिखाणाची स्फूर्ती घेऊन, 'स्फुट' लिखाण करून ते स्थानिक दैनिकांत 'विशिष्ट' सदरांत सादर करण्याचा प्रयत्न केला जाईल.

'जनसंवाद-मंचा'चे दोन स्पष्ट हेतू आहेत. पहिला म्हणजे स्थानिक पातळीवर सामाजिक आस्था निर्माण करणं, जे गटा-गटांतील परिचयवृद्धीतून साधलं जाईल. निर्माण होणाऱ्या आस्थात्मक घनिष्ट संबंधांतून हळुहळू स्थानिक समस्यांना वाचा फुटेल व जबाबदारी घेऊन त्या समस्यांचं निवारण करण्याची इच्छाशक्ती गावोगावीच्या 'मंचा'त निर्माण होईल. दुसरा हेतू आहे तो म्हणजे उपरोक्त 'स्फुट' लेखनाच्या प्रकाशनातून ठिकठिकाणच्या दैनिकांद्वारे 'जनसंवाद'च्या विचारांचा प्रचार, प्रसार साधला जाऊन जनजागृती साधण्यास मदत होण्याचा. महाराष्ट्राबरोबर इतर राज्यांत असे गट निर्माण होण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. अशा तऱ्हेनं जनसंवाद थोडाफार देशव्यापी झाल्यानंतर व योग्य ते सदस्य संख्याबल लाभल्यानंतर दूरगामी उद्दिष्टं साधण्याकरता उपक्रम सुरू करता येतील.

**● दूरगामी उद्दिष्टं**

'जनसंवाद'ची कृती आंदोलनात्मक नसेल व अंगिकारलेले पुढील उपक्रम लोकशाही मार्गानं व्यावसायिकरीत्या राबवले जातील.

● उद्‌बोधनातून (एनलाइटनमेंट) जनजागृती साधून सामाजिक परिवर्तन साधण्यासाठी समाजात अनुकूल मानसिकता निर्माण करणं,

● उद्दिष्टं साधण्यासाठी माध्यमांकडून पुढाकार घेतला जाईल असं वातावरण निर्माण करणं,

● गावोगावी, शिक्षणक्षेत्रातील ज्ञानवंत, विद्यापीठांतील मानवविज्ञान शास्त्रज्ञ, सुधारणावादी शालेय संस्थांमधील शिक्षक आणि अधिकारी, वगैरे मंडळींकडून शालेय शिक्षणात गरजेच्या सुधारणा साधून औपचारिकरीत्या उद्याची पिढी घडवण्याच्या 'जनसंवाद'च्या प्रस्तावाबाबत शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार साधून त्या प्रस्तावाची आखणी करणं (२०१० च्या शेवटास अशा तऱ्हेची बैठक पुण्यात झाली आणि त्या गटचर्चेतून 'जनसंवाद'च्या प्रस्तुत प्रस्तावाला शास्त्रशुद्ध पाठिंबा मिळाला.),

● शिक्षणक्षेत्राला प्रभावित करून शालेयशिक्षणात गरजेच्या सुधारणा साधण्यासाठी मानवविज्ञान शाखांतील अभ्यासूंना व विद्यापीठांतील शास्त्रज्ञांना जरूर ते अर्थसाह्य उपलब्ध करून देऊन उपयुक्त संशोधन करण्यास प्रवृत्त करणं. (अशा शास्त्रोक्त अभ्यासाची व संशोधनाची उद्दिष्टं आहेत:

- देशभरातील शालेयशिक्षणात समाविष्ट करण्यासाठी योग्य तो समाजशिक्षणाचा अभ्यासक्रम (करिक्युलम) व शिकवण्याच्या पद्धती (पेडगॉगी) ठरवणं, व

- विकसित देशांतील शालेयशिक्षणात समाविष्ट केलेल्या अभ्यासक्रमांतील योग्य बाबींचा स्वीकार होण्यासाठी शास्त्रशुद्ध प्रयत्न करणं.),

● समाजशिक्षणाचा उपरोक्त अभ्यासक्रम देशभरातील शाळा-कॉलेजांतून सुयोग्य पद्धतीनं अंमलात आणण्याकरता शासनाला राजी करवून घेण्यासाठी दबावगट (प्रेशर ग्रूप्स) निर्माण करणं, आणि

● उपरोक्त शैक्षणिक सुधारणा अंमलात आणण्यासाठी योग्य परिस्थिती निर्माण व्हावी म्हणून संबंधित कायद्यांचा अभ्यास करून निवडक राज्यांतील उच्च न्यायालयांत 'जनहितयाचिका' प्रविष्ट करणं आणि त्या लवादांत यशस्वी होण्याकरता संबंधित कायद्यांचा गरजेचा अभ्यास व इतर संशोधन विशेषज्ञांकडून होण्यासाठी प्रयत्न करणं. अर्थात, कायद्याच्या दृष्टिकोनातून केलेल्या ह्या तयारीतून देशातील सर्वोच्च (सुप्रीम) न्यायालयाकडून केंद्र शासनाला गरजेचा आदेश देणं हे अंतिम उद्दिष्ट असेल. नंतर, 'जनसंवाद'चं काम तुलनात्मकरीत्या सोपं असेल. ते कार्य म्हणजे, सर्वोच्च न्यायालयाकडून केंद्र शासनाला दिल्या गेलेल्या आदेशांची अंमलबजावणी होण्यासाठी गरजेचं लक्ष देणं, पाठपुरावा करणं.

**मूल्यांचं विवेचन**

भारतीय समाजात **लोकशाही, नागरिकत्व व सामाजिक बांधिलकी** ही मूल्यं रुजवणं हे 'जनसंवाद'च्या वृत्तीबदलाच्या चळवळीचं प्रमुख लक्ष्य आहे.

**● लोकशाही**

बऱ्याच जणांची लोकशाहीची कल्पना राज्यव्यवस्थेशी निगडित असते, व ती तिथेच थांबते. लोकशाही हे वैचारिक मूल्य असून प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातील सर्व परिघांत ते व्यक्त होतं - कौटुंबिक, व्यावसायिक आणि सामाजिक. सुटीसाठी परगावी जाण्याचं ठिकाण कुटुंबात कोण ठरवतं? कार्यालयात एखादी योजना कार्यान्वित करण्यापूर्वी संबंधित लोकांना विचार व्यक्त करण्याची संधी दिली जाते का? एखाद्या रस्त्यावरील रहदारीची समस्या दूर करण्यासाठी तेथील रहिवासी एकत्र येऊन विचारविनिमय करतात का? अशा प्रश्नांतून लोकशाहीमूल्यांवर प्रकाश पडावा.

**● सामाजिक बांधिलकी**

समाज छोटा होता तेव्हा लोक एकमेकांना ओळखत होते आणि सामाजिक बांधिलकी जोपासण्यासाठी विशेष प्रयत्न करावा लागत नव्हता. परस्परावलंबन सहज लक्षात यायचं व त्यातूनच आपोआप बांधिलकी निर्माण व्हायची. बारा बलुतेदारीत अनुभवलं तसं आजच्या फापटपसाऱ्यात आपलं अवलंबन एकास-एक असं नसतं. म्हणूनच, 'माझा ह्या घटनेशी, त्या व्यक्तीशी संबंध काय' असा विचार करून आपण दूर होतो. खरं तर, बँकेतील कर्मचारी, रेल्वे, बस, वगैरे रहदारीच्या सुविधा पुरवणारे, नगरपालिका देत असलेल्या विविध सेवांचं व्यवस्थापन

करणारे, शाळा-कॉलेजांतील शिक्षक व इतर अधिकारी, इस्पितळांतील वैद्यकीय सल्लागार व कर्मचारी, तद्वत, प्रशासनातील कोणत्याही खात्यांतील नोकरवर्ग, वगैरे सारी मंडळी, आपण सारेच परस्परांवर अवलंबून असतो, एकमेकांसाठीच काम करत असतो; पण त्रयस्थपणे. त्या कामात जिव्हाळा नसतो - दुसऱ्या बाजूचा विचार (एम्पथी) केला जात नाही. म्हणून, देणारा तत्पर नसतो आणि लाभार्थींना चांगल्या सेवा देणाऱ्याचं कौतुकही नसतं. ह्या कारणांमुळे सर्व गोष्टी जमेल तेवढ्या व ङ्कटाकणंङ्क टाकल्यासारख्या केल्या जातात. करत असलेल्या कामाचा रास्त अभिमान सहसा अनुभवास येत नाही व कार्यक्षमता क्वचितच नजरेस येते; सर्व कामं होत असतात ती पगारासाठी, पगारवाढी-साठी आणि उन्नतीसाठी (प्रमोशन).

रस्त्यावर अपघात झाला तर जखमींच्या मदतीसाठी आपण थांबतो का? वयस्क लोकांच्या अडचणी समजून कोणत्या सोयी उपलब्ध केल्या जातात ह्या गोष्टीकडे तरुणांचं कधी लक्ष असतं का? आपलं अपत्य अंध, बहिरं वा मुकं नसेल तर अशांच्या शाळांमध्ये आपण रस घेतो का? शेजारच्या गरीब वस्त्यांतील समस्यांचा आपल्याशी काही संबंध असतो का?

परमार्थ म्हणून नव्हे, नीट विचार केला तर दूरगामी स्वार्थासाठी आम्हा साऱ्यांना सामाजिक बांधिलकीचं भान गरजेचं आहे.

**● नागरिकत्व**

उपलब्ध शासकीय-प्रशासकीय वा खासगी व्यवस्थांचा उत्तम फायदा त्याच समाजाला मिळू शकतो की ज्या समाजातील बहुतांश सदस्य चांगले नागरिक असतात. अशा नागरिकांना जशी हक्कांची जाण असते, तद्वत, त्यांना त्यांच्या जबाबदारीचंही भान असतं. थोडक्यात, नागरिकत्वाच्या मूल्यांचं पालन म्हणजेच रीतीभातींचं, नियमांचं, कायद्यांचं पालन! रोजच्या जीवनात निदान चार क्षेत्रांतील नियमांचं पालन आपण सर्वांनी समजुतदारपणे व मनापासून केलं तर आहे त्या परिस्थितीतही भारतीयांना रोजच्या जीवनात कमालीचं सुख अनुभवास येईल, सर्वांचेच दैनंदिन व्यवहार सहज व सुलभ होतील - ती चार क्षेत्रं आहेत रहदारीचे नियम, कचरा व्यवस्थापन व सार्वजनिक स्वच्छता, रांगेची शिस्त आणि वक्तशीरपणा.

**अपेक्षित समाजपरिवर्तन**


जसजसा 'जनसंवाद'च्या विचारांचा प्रसार होईल व लोक उपरोक्त मूल्यांचं महत्त्व ओळखून त्या मूल्यांना रोज आचरणात आणतील तेव्हा विविध व्यवस्थांची परिस्थिती समाधानकारक ठरेल वा लोकांकडून पुढाकार घेतला जाऊन जाणवलेल्या उणिवांचं निराकरण साधलं जाईल.

लोकशाहीत शासन-प्रशासनावर अवलंबून राहण्यापेक्षा उपरोक्त मूल्यांचं पालन जास्त जनहित साधेल आणि ते आपल्याच हातात आहे!

स्वातंत्र्य-चळवळीचा लढा ब्रिटिश शासनाविरुद्धचा होता. आज देशात जनतेचं, आमचंच शासन आहे; म्हणून लढा शासनाविरुद्ध असूच शकत नाही. ह्या गोष्टीचं भान हे 'जनसंवाद'चं प्रमुख आकलन आहे आणि त्या आकलनातूनच लक्षात आलं आहे की लोकशाहीत जे साधायचं असतं ते शासनाकडूनच करवून घ्यायचं असतं. हीच कार्यपद्धत मानून 'जनसंवाद' पुढील वाटचाल करेल.

देशात लोकशाही आहे, पण समाजाची मानसिकता सरंजामशाहीचीच आहे. ती कशी बदलता येईल? स्वतंत्र्योत्तर साठ वर्षांनंतरही आपल्यापुढील यक्षपश्न हाच आहे. ह्या प्रश्नाचं उत्तर महत्त्वाचं आहे आणि लोकशाहीत ते समाजानंच शोधायचं असतं. म्हणूनच, 'जनसंवाद'चं घोषवाक्य आहे, ''आपण नाही तर कोण, आता नाही तर केव्हा?''

**सु. गो. तपस्वी**
समन्वयक -जनसंवाद
९७६६१ ५२२५३
suhas@fandsindia.com.




**मूळ किंमत ६००/-**
**सवलतीत ३६०/-**

## संकल्पनाकोश (खंड १) - सुरेश वाघे

'ग्रंथाली'ने 'ज्ञानकोश' वर्गातला एक कोश प्रकाशित केला आहे. 'संकल्पनाकोश'. कोशकार आहेत सुरेश पांडुरंग वाघे.

ढगांचे प्रकार किती आहेत, ठाऊक आहे? हा कोश तुम्हाला ते सांगेल.

पर्वताचा 'कडा' तुम्हा-आम्हाला माहीत असतो; 'खिंड' माहिती असते. पण खोंडा? पाज? भोय? शहाड? पर्वताशी निगडीत ह्या संकल्पनांचा नेमका अर्थ ठाऊक आहे? तो जाणून घेण्याची जिज्ञासा असेल तर वाघे यांचा हा 'संकल्पनाकोश' तुमच्या मदतीला येईल.

ग्राशेर बम, साल्टारो कांग्री, राकापोशी ही पर्वतशिखरांची नावे विदेशी वाटतात? पण ती हिमालयाची भारतीय शिखरे आहेत ही माहिती या कोशात मिळेल.

अशा प्रकारचे अगणित तपशील वाघे यांनी या 'संकल्पनाकोशा'त समाविष्ट केले आहेत आणि या कोशाचे संदर्भमूल्य वाढवले आहे. जिज्ञासापूर्तीचा परमानंद अनुभवण्यासाठी तुम्हाला हा संकल्पनाकोश मुळातच पाहावा लागेल.